# अद्यावत १२ अभ्यासिका निर्माण केल्या जाणार

## डॉ. जयश्री थोरात; प्रत्येक अद्यावत वाचनालयासाठी ३० लाख रुपयांचा निधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : यशवंतराव चव्हाण यांचे समृद्ध वारसदार अशी ओळख असलेले महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका हा सहकार, शेती, शिक्षण, जलसिंचन, ग्रामीण विकास यामधून राज्यात आदर्शवत बनवला आहे. तालुक्यातील तरुणांना स्पर्धा परीक्षा व वाचनाची सुविधा उपलब्ध व्हावी याकरता अद्यावत १२ अभ्यासिका निर्माण केल्या जाणार असून चंदनापुरी, निमगाव बुद्रुक व धांदरफळ बुद्रुक येथे या नवीन अभ्यासिकांचे भूमिपूजन कॅन्सरतज्ञ युवक नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात चंदनापुरी, निमगाव बुद्रुक व धांदरफळ बुद्रुक येथील अद्यावत अभ्यासिकांची भूमिपूजन संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात, रामहरी कातोरे, अनिलराव देशमुख, विजय राहणे, शांताराम कढणे, चंदनापुरीचे सरपंच भाऊराव रहाणे, उपसरपंच हौशाबाई कढणे, हर्षल राहणे, रोहिदास राहणे, धांदरफळ सरपंच उज्वला देशमाने, सतीश खताळ, मनीष गोपाळे, भास्कर गोपाळे, कारभारी शेळके, माधवराव कानवडे, सरपंच सोमनाथ, सचिन कानवडे, राजेंद्र कानवडे, भाऊसाहेब फरगडे, राजेंद्र मोरे आदींसह गावातील ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. थोरात म्हणाल्या की, संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा आहे. बाळासाहेब थोरात यांनी प्रत्येक गावात



विकासाच्या मूलभूत योजना राबवल्या आहेत. ग्रामीण विकासातून संगमनेर तालुका राज्यात अग्रगण्य बनवला आहे. याचबरोबर तरुणांसाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले असून त्यांच्या कलागुणांना वाव दिला आहे.

संगमनेरमध्ये सध्या सुरू झालेल्या विविध आमली पदार्थांची तस्करी ही तरुण पिढीसाठी अत्यंत भयावह असून याबाबत बाळासाहेब थोरात यांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सातत्याने पालकांना जागरूक राहण्याची आव्हान केले असून आपली तरुण पिढी वाचवण्यासाठी त्यांना वाचनाची सवय लावणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या.

रामहरी कातोरे म्हणाले की, लोकनेता नेहमी समाजाच्या सर्वांग प्रगतीचा विचार करत असतो. आणि ते काम कायम बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. सर्व समाजाला बरोबर घेऊन सर्वांच्या विकासासाठी काम करणाऱ्या या नेतृत्वाने प्रत्येक गावात विकासाच्या योजना राबवल्या. याचबरोबर संगमनेर तालुका दुष्काळमुक्त करण्यासाठी निळवंडे धरण व कालव्यांची निर्मिती केली.

हर्षल राहणे म्हणाले की, युवकांना वाचनाची सवय लावण्याचे काम लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून होत आहे. मात्र काही लोक युवकांना अमली पदार्थांची सवय लावण्याचे काम करत असल्याचे टीका त्यांनी केली.

> संगमनेर हे आता गुणवत्तेचे शैक्षणिक केंद्र निर्माण झाले असून ग्रामीण विद्यार्थ्यांना वाचनालय व आधुनिक अभ्यासिका निर्माण व्हावी याकरता १२ अभ्यासिका मंजूर केल्या आहेत. या प्रत्येक अभ्यासिका ३० लाख रुपयांच्या निधीतून उभारल्या जाणार आहेत. या अभ्यासिकांमधून तरुणांना वाचनाची मोठी संधी निर्माण होणार आहे. आणि या माध्यमातून आदर्श व समृद्ध तरुण पिढी निर्माण होणार आहे.
> **– डॉ. जयश्री थोरात**

# विवेक कोल्हे यांच्या व्हिजनरी नेतृत्वावर प्रभावित होत दडीयाल यांचा भाजपा प्रवेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगावमध्ये एक महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड घडली असून, ठाकरे गट शिवसेनेचे माजी शहरप्रमुख कलविंदरसिंग दडीयाल आणि गुरमितसिंग दडीयाल यांनी आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. माजी आ. स्नेहलताताई कोल्हे आणि भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते रविकाका बोरावके, हरिभाऊ गिरमे, कैलास खैरे, नरेंद्र डंबीर, नसीरभाई सय्यद, विनोद राक्षे, सुशांत खैरे, नितीन वानखेडे, हुसेन सय्यद आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.




शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी आणि विकासाभिमुख राजकारणासाठी स्पष्ट भूमिका मांडणाऱ्या युवानेते विवेक कोल्हे यांच्या व्हिजनरी नेतृत्वावर विश्वास ठेवून दडीयाल बंधूंसह कार्यकर्त्यांनी भाजपचा झेंडा हातात घेतला. विवेक यांनी अल्पावधीतच सेवा आणि स्वच्छ राजकारणाचा ठसा उमटवला असून, त्यांच्याभोवती वाढणारा जनसमर्थनाचा उंचावलेला आलेख आजच्या प्रवेशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

दुसरीकडे, केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी राजकारण करणाऱ्या काका कोयटेंच्या आणि आमदार काळे यांच्या मनसुब्यांना युवानेते विवेक कोल्हेंनी एकाच दिवसात सुरुंग लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोरात आहे.

### काळे आणि कोयटे यांना धक्का

कोपरगावच्या भविष्याकडे पाहताना, स्वच्छ नेतृत्व आणि पारदर्शकतेवर आधारित राजकारणाची जनतेची अपेक्षा वाढत असताना, आजचा प्रवेश हा शहराच्या राजकीय समीकरणात मोठा बदल घडवणारा ठरला आहे.

भारतीय जनता पार्टीच्या 'सबका साथ, सबका विकास' या तत्वज्ञानावर विश्वास ठेवत दडीयाल बंधूंनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.यासह लवकरच यापेक्षाही मोठा धमाका होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले आहे.

# नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गाचे निकृष्ट काम!

## अन्याय निवारण निर्मूलनची राजमार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांकडे तक्रार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ वरील काळेवाडी ते अहिल्यानगर या दरम्यान सुरू असलेल्या काँक्रीटीकरणाच्या कामात गंभीर त्रुटी व निकृष्ट दर्जा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे काम करणाऱ्या कंपनीविरुद्ध अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आणि कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व नाशिक विभागीय आयुक्तांना निवेदन दिले असून, या प्रकरणी कारवाई न झाल्यास २४ नोव्हेंबरपासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मागील एक वर्षापासून महामार्गाचे काँक्रीटीकरण निकृष्ट दर्जाचे केले जात आहे. रस्त्याच्या अपुऱ्या गुणवत्तेमुळे आतापर्यंत १०० हून अधिक नागरिकांचा अपघातात मृत्यू झाला आहे. रस्त्याचे काम सुरू असतानाही टोल वसुली सुरू आहे, हे देखील अत्यंत गंभीर प्रकरण असल्याचे समितीचे म्हणणे आहे.

काँक्रीटीकरण दरम्यान अनेक ठिकाणी मजुरांच्या सहाय्याने हाताने सिमेंट पसरवले जात असून, पेवर मशिनच्या अभावी रस्ता उंच-खोल झाला आहे. त्यामुळे वाहने जंपींग होऊन अपघातांची शक्यता वाढली आहे. काँक्रीटीकरणासाठी वापरला जाणारा मुरूम पारनेर तालुक्यातील जामगाव (गट क्र. २८) येथून मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या उत्खनन करण्यात आल्याचा आरोप निवेदनात केला आहे.

> **बालकामगार कायद्याचे उल्लंघन**
> ढवळपुरी फाटा येथील टीएमसी प्लँटला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी नसतानाही तो चालवला जात आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीचे व पिकांचे नुकसान झाले असून ग्रामस्थ वायूप्रदूषणामुळे आजारांना बळी पडत आहेत. याच प्लँटवर बालकामगारांचा वापर होत असल्याचेही समितीने उघड केले असून, बालकामगार कायद्याचे खुलेआम उल्लंघन होत आहे.

# नाना डोंगरेंचा समाजभूषण पुरस्काराने गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : येथील सामाजिक कार्यकर्ते नाना डोंगरे यांना कविवर्य नारायण सुर्वे जन्मशताब्दी निमित्त, मराठी साहित्य मंडळ संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

१६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन केडगाव येथील स्व. शाहूराव देशमुख साहित्य नगरीत उत्साहात पार पडले. यामध्ये डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर, जिल्हा अध्यक्ष त्र्यंबकराव देशमुख, मेधाताई काळे, प्राचार्य शिवाजीराव भोर, डॉ. ज्ञानदेव पांडुळे, डॉ. गिरीश कुलकर्णी, संजय बंदिष्टी, जयद्रथ खाकाळ, सुनील मामा कोतकर, ललिता गावंडे, घनश्याम पांचाळ, दशरथ यादव, लीना आढे, डी. आर. बांगर, संदिप रासकर आदी मान्यवर उपस्थित होते.



स्व. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नाना डोंगरे नगर तालुक्यासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध क्षेत्रात कार्य करत आहे. संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरु आहे. डोंगरे यांच्या विविध क्षेत्रातील सामाजिक कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रीय ऊर्जा परिषदेत महावितरणला ५ पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित १९ व्या राष्ट्रीय ऊर्जा परिषदेत विविध वर्गवारीमध्ये उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत बुधवारी (दि. १२) महावितरणला पाच पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामध्ये हरित ऊर्जा आणि कार्यक्षमता व ग्राहक सेवेची परिणामकता यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रथम स्थान मिळाले आहे.

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे नवी दिल्ली येथे दोन दिवसीय राष्ट्रीय ऊर्जा परिषद उत्साहात झाली. महावितरणने




हरित ऊर्जा, तंत्रज्ञान स्वीकार आणि ग्राहक सेवेसह वीज क्षेत्रातील विविध उद्दिष्टांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. त्याची दखल घेत या परिषदेत महावितरणला हरित ऊर्जेतील प्रगती तसेच नाविन्यासह परिणामकता वर्गवारीत देशात प्रथम स्थान मिळवले आहे. तर सेवांची गुणवत्ता आणि ग्राहक सक्षमीकरण, तंत्रज्ञानाचा स्वीकार, नावीन्यासह परिणामकता सामान्य या वर्गवारीमध्ये राष्ट्रीय स्तरावर तिसरे स्थान मिळाले आहे.

महावितरणच्या वतीने अधीक्षक अभियंता किरण नागावकर व सलोनी वाकोडे, कार्यकारी अभियंता नीलम गांगुर्डे यांनी हे पुरस्कार स्वीकारले आहे.

# उर्दू कन्या शाळेत मौलाना आझादांना अभिवादन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीच्या मुकुंदनगर येथील सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आजाद यांच्या जयंतीनिमित्त शिक्षण दिन साजरा करण्यात आला. यावेळी त्यांना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापक सय्यद नौशाद, हसीब शेख, शिक्षक शेख फरजाना दिलावर, शेख अस्लम पटेल, शेख शाहिन, शेख हिना, पठाण फरहान उज़्मा , शेख यास्मीन व शेख सुलताना आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापक नौशाद सय्यद म्हणाले की, स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांचे देशावर प्रेम होते. शिक्षण दिनानिमित्त या दिवसाचे महत्त्व समजून घेणे आपल्यासाठी खूप महत्वाचे आहे. हा खास दिवस मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या व्यक्तिमत्त्वाला श्रेय देतो. मौलाना आझाद यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाला कोणत्याही परिचयाची गरज नाही. मौलाना आजाद यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत.

> मौलाना आझाद केवळ स्वातंत्र्यसैनिक नव्हते, तर धार्मिक विद्वान पत्रकार व नेते देखील होते. आपण मौलाना आझाद यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास केला पाहिजे आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवले पाहिजे. जर आपल्याला शिक्षण क्षेत्रात उत्कृष्टता मिळवायची असेल तर आपण अभ्यासाची सवय अंगीकारली पाहिजे.
> – नौशाद सय्यद, मुख्याध्यापक

# चंद्रपूरमध्ये जिजाऊ ब्रिगेडचे राज्य महाअधिवेशन

### अनिता काळे; महिलांच्या सक्षमीकरणासाठी रणरागिनींचा विचार महोत्सव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेडचे राज्य महाअधिवेशन दि. २१ ते २३ नोव्हेंबरदरम्यान चंद्रपूर येथे उत्साहात पार पडणार आहे. रणरागिनींचा विचारांचा उत्सव या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या अधिवेशनात महिलांच्या सक्षमीकरणावर, सामाजिक बांधिलकीवर, शिक्षण आणि नेतृत्व विकासावर सखोल चर्चा होणार आहे. या अधिवेशनासाठी जिल्ह्यातील सर्व महिलांनी सहभागी व्हावे, असे मराठा समन्वय परिषदेच्या राज्य कार्याध्यक्षा अनिता काळे यांनी आवाहन केले आहे.

या अधिवेशनाचा शुभारंभ २१ नोव्हेंबरला चंद्रपूर येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृहात होणार आहे. महाराष्ट्रासह देशभरातील आणि परदेशातील जिजाऊंच्या लेकी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. दिल्ली, पटना, मुंबई, पुणे, यवतमाळ, नागपूर, गडचिरोली यांसह विविध राज्यांतील महिला प्रतिनिधी या अधिवेशनात विचारमंथनासाठी सहभागी होणार आहेत.हे अधिवेशन सांस्कृतिक, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, राजकीय आणि बौद्धिक चर्चांनी भरलेले असेल. तीन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनादरम्यान विविध विषयांवर परिसंवाद, कार्यशाळा, प्रेरणादायी व्याख्याने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

> जिजाऊ ब्रिगेड ही वैचारिक संघटना असून महिलांच्या सर्वांगीण विकास, शिक्षण, आत्मनिर्भरता आणि नेतृत्वगुण वाढविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत आहे. समाजातील स्त्रियांच्या हक्कांचे भान निर्माण करून त्यांना सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात पुढे आणणे हे या संघटनेचे प्रमुख ध्येय आहे.
> **– अनिता काळे**

# नागरदेवळे गटातून सुनिता पाखरेंची उमेदवारी!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील ग्रामपंचायत सदस्य मयुर पाखरे यांच्या मातोश्री सुनिता पाखरे यांनी नागरदेवळे जिल्हा परिषद गटातून उमेदवारी करावी, अशी मागणी स्थानिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. अलीकडेच पार पडलेल्या समर्थकांच्या बैठकीत पाखरे यांच्या नावाची उमेदवारीसाठी एकमुखी मागणी कायकर्त्यांनी केली. या बैठकीत गावातील अनेक युवा कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मयुर पाखरे यांनी नागरदेवळे जिल्हा परिषद गटातून निवडणुकीसाठी तयारी दर्शवली असून, त्या आपल्या मातोश्री सुनिता चंद्रकांत पाखरे यांना उभे करणार असल्याचे स्पष्ट केले. गटातील प्रलंबीत विकासकामे मार्गी लावण्यासाठी व जनतेच्या सेवेसाठी आपल्या ताकदीने योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. ग्रामपंचायत सदस्य मयुर पाखरे यांनी नागरदेवळे गावात अनेक विकासात्मक कामे पार पाडली आहेत. विकासात्मक कामातून त्यांनी स्थानिकांमध्ये विशेष विश्वास निर्माण केला आहे. मयुर पाखरे हे स्व. आमदार शिवाजी कर्डीले यांचे विश्वासू कार्यकर्ते असून, सध्या अक्षय कर्डीले यांचे खंदे समर्थक मानले जातात.

# खेळाडूंना सोयी-सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील

## भानुदास कोतकर; केडगावमध्ये रंगला फ्लडलाईट्सखाली क्रिकेटचा थरार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केडगावमध्ये विकासाबरोबरच क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे काम सातपुते परिवाराच्या वतीने सातत्याने होत आहे. समाजात एकता, शिस्त आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे साधन म्हणजे खेळ. आज या मैदानावर तरुणांचा उत्साह पाहून आनंद होत आहे. पुढील काळात या भागातील खेळाडूंना चांगल्या सोयी-सुविधा निर्माण करुन देण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे प्रतिपादन भानुदास कोतकर यांनी केले आहे.

केडगाव, नगर-नेप्ती रोड येथील विश्वेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित भव्य फ्लडलाईट्स प्लास्टिक बॉल क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. यावेळी ते बोलत होते. तब्बल अकरा दिवस रात्रंदिवस रंगलेल्या सामन्यांनी केडगावच्या मैदानात क्रिकेटचा उत्सव भरला होता. शहरासह नगर तालुक्यातील विविध संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या स्पर्धेच्या विजेतेपदाचा मान स्टेशन स्टार्स संघाने पटकावला,



तर एकनाथ नगर संघाने द्वितीय, आणि वांबोरी संघाने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्या संघांना अनुक्रमे संतोष कोतकर यांच्या वतीने ३१ हजार, मयूर जगदाळे यांच्या वतीने २१ हजार, आणि संतोष बोरा यांच्या वतीने ११ हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली. भानुदास कोतकर यांनी क्रिकेटचा उत्साह पाहून ११ हजारांचे बक्षीस जाहीर केले.

यावेळी गणेश सातपुते, जयदत्त खाकाळ, शशिकांत आठरे, निलेश सातपुते, अशोक कराळे, भुषण गुंड, सचिन सातपुते, संतोष कोतकर, मयूर जगदाळे, कुमार होळकर, भुषण गुंड, शशिकांत आठरे, बेरड सर, जयदीप खाकाळ, दादू चौगुले, सुनील उमाप, एकनाथ जपकर आदींसह केडगाव ग्रामस्थ उपस्थित होते.

> शहर व ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी या फ्लडलाईट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत सहभागी सर्व संघांनी उत्कृष्ट खेळ करून ग्रामीण क्रिकेटचा दर्जा उंचावला आहे. यामधून अनेक तरुणांना आपल्या खेळगुणांचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली. येत्या काळात अशाच स्पर्धा मोठ्या प्रमाणात घेऊन, तरुणांच्या खेळाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न राहणार आहे.
> **– सागर सातपुते**

# शरद पवारांचे विचार जनतेपर्यंत पोहोचवा

## माजीमंत्री तनपुरे; राहाता येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) ही विचारधारेवर चालणारी आणि कार्यकर्त्यांच्या बळावर उभी राहिलेली संघटना आहे. आजच्या बदलत्या राजकीय परिस्थितीत प्रत्येक कार्यकर्त्याने जागरूक राहून शरद पवार यांचे विचार जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

आगामी नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांना सज्ज राहावे, असे आवाहन माजीमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) अहिल्यानगर जिल्हा उत्तर विभागाची आढावा बैठक आज राहाता येथे मोठ्या उत्साहात पार पडली. जिल्हा उत्तर विभागातील सर्व तालुक्यांतील पदाधिकारी, तालुकाध्यक्ष आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### काम केल्यास यश आपोआप : वर्पे

संदीप वर्पे (जिल्हाध्यक्ष उत्तर विभाग) यांनी संघटनातील सुसंवाद, जबाबदारी आणि कार्यक्षमतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, ''आगामी निवडणुका या पक्षाच्या संघटनशक्तीची खरी कसोटी असणार आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने आपापल्या क्षेत्रात जबाबदारीने आणि निष्ठेने काम केल्यास यश आपोआप मिळेल.''

या बैठकीचे अध्यक्षस्थान रावसाहेब नाथाजी पाटील म्हस्के यांनी भूषविले. बैठकीत प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, ज्येष्ठ नेते दादाभाऊ कळमकर, संदीप वर्पे, अरुण पा. कडु, सुधीर म्हस्के, अनुप दंडवते, महेंद्र शेळके आणि किरण कडु आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीची प्रस्तावना सुधीर म्हस्के यांनी केली. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, त्यावरील रणनिती, प्रचार नियोजन आणि संघटनात्मक तयारी यावर सविस्तर विवेचन केले. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पक्ष संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

एकजुटीचे महत्त्व अधोरेखित ज्येष्ठ नेते दादाभाऊ कळमकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास आणि एकजूट हाच पक्षाचा पाया आहे. आपण परस्परांमधील संवाद वाढवून संघटन मजबूत केले, तर अहिल्यानगर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) निश्चितच वर्चस्व निर्माण करेल.'' बैठकीदरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. उमेदवार निवड प्रक्रिया, मतदारांपर्यंत पक्षाची नीती पोहोचविण्याचे नियोजन, तसेच प्रचारासाठी नव्या पद्धतींचा वापर यावर विचारमंथन झाले. प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र निवडणूक तयारी समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या शेवटी अध्यक्ष मा. रावसाहेब नाथाजी पाटील म्हस्के यांनी सर्व मान्यवरांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. त्यांनी म्हटले की, ''या बैठकीतून उत्तर विभागातील सर्व कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळाली आहे.

एकजुटीने आणि निष्ठेने काम केले, तर आगामी निवडणुकांत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) निश्चितच विजयी ठरेल.''

# मौलाना आझाद यांचे महत्वपूर्ण योगदान

## अब्दुल्लाह चौधरी; शिक्षक पुरस्काराचे वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये देशाचे पहिले शिक्षणमंत्री भारतरत्न मौलाना अबुलकलाम आझाद यांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. शिक्षण मंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य अलौकिक आहे. आणि म्हणून त्यांच्या नावाने दिल्या जाणारा मौलाना आजाद शिक्षक पुरस्कार ज्यांना मिळाला. ते सर्व शिक्षक अभिनंदनास पात्र आहेत, असे प्रतिपादन अंजुमन ए इस्लाम ट्रस्ट संगमनेरचे चिफ ट्रस्टी व महाराष्ट्र राज्य उर्दू बचाव समितीचे राज्याध्यक्ष अब्दुल्लाह हसन चौधरी यांनी केले.

मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषद व रहमत सुलतान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मौलाना आझाद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जात असलेल्या राष्ट्रीय एकता सप्ताह मध्ये जिल्ह्यातील



१६ गुणवंत व ज्ञानवंत शिक्षकांना भारतरत्न मौलाना आझाद शिक्षक पुरस्कार देऊन शानदार कार्यक्रमात गौरविण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चौधरी हे बोलत होते. संगमनेर येथील अँग्लो उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन शेख गणी हाजीभाई यांचे शुभ हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. व्यासपीठावर अंजुमन इस्लाम संगमनेर ट्रस्टचे सचिव शौकतखान पठाण,उर्दू साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष के. के. खान, रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष भैरवनाथ वाकळे, सरकारी शाळा वाचवा अभियानाचे संयोजक सुदाम लगड, उर्दू महिला आघाडीचे अध्यक्ष नर्गिस इनामदार, डॉ शमा फारुकी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबिदखान दूल्हेखान यांनी तर सूत्रसंचालन उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष सलीमखान पठाण यांनी केले. तर आभार महोत्सव समितीचे अध्यक्ष भैरवनाथ वाकळे यांनी मानले.

# ढाब्यांवरील बसथांबे बंद करावेत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : अहिल्यानगर संभाजीनगर महामार्गावरील नेवासे तालुक्यातील वडाळ्यानजीक अनधिकृत ढाब्यांवर एसटी महामंडळाचे बसथांबे पुन्हा एकदा डोकेदुखी ठरू लागले आहेत. प्रवाशांचा वेळ व पैसा खर्च करणारे हे थांबे तत्काळ बंद करावेत, अशी मागणी प्रवासी वर्गातून जोर धरू लागली आहे. एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालयाने या गंभीर प्रकाराकडे लक्ष दिले नाही, तर आंदोलन करण्याचा इशारा सोनई आणि नेवासे परिसरातील प्रवाशांनी दिला आहे. अहिल्यानगर- संभाजीनगर महामार्गावरील वडाळा व घोडेगावलगत असणाऱ्या ढाब्यांवर एसटी महामंडळाच्या बस नियमित थांबतात.

मात्र, या दोन्ही ठिकाणी थांब्याचा अधिकृत परवाना नसल्याचा दावा प्रवासी करत आहेत. याबाबत काही प्रवाशांनी एसटीच्या तारकपूर आगारात तक्रारी केल्याचेही सांगितले जाते. मात्र कार्यवाही होत नसल्याने प्रवासी संतप्त झाले आहेत. ढाब्यांचे मालक एसटीच्या चालक-वाहकांशी आर्थिक तडजोड करीत असल्याचीही चर्चा आहे. काही प्रवाशांनी या प्रकाराचे व्हिडीओ चित्रीकरण केल्याचेही सांगितले जात आहे. घोडेगाव ते नेवासे फाटा हा फक्त २० मिनिटांचा प्रवास असताना प्रवाशांचा मोठा वेळ वाया जातो. प्रवासादरम्यान रस्त्यांवरील ढाब्यांवर चहापानासाठी एसटी बस थांबल्यानंतर किमान अर्धा ते पाऊण तास वाया जातो. अहिल्यानगर ते संभाजीनगर या दोन तासांच्या प्रवासादरम्यान बस ढाब्यावर थांबवण्याची गरज नसल्याचे प्रवाशांनी विभाग नियंत्रक कार्यालयास यापूर्वीही कळवले होते.



### प्रवाशांची लूट थांबवावी

जळगाव, भुसावळ, दौंड, मुक्ताईनगर, रावेर, या आगारांच्या बस थांबत असलेल्या ढाब्यावर प्रवाशांची आर्थिक लूट केली जाते. वाहक-चालकांनीदेखील कबूल केले की आगाराचे पत्र नसतानाही इतर बस थांबतात म्हणून आम्ही थांबतो. त्यामुळे अधिकृत परवानगी आहे की नाही याची खातरजमा करून प्रवाशांची लूट थांबवावी.

# कालभैरव मंदिरात दीपोत्सव साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : शहरातील प्राचीन सिद्धेश्वर मंदिराजवळील कालभैरव मंदिरात कालभैरव जयंतीनिमित्त सालाबादप्रमाणे बुधवारी (दि.१२) शेकडो प्रज्वलित करून दीपोत्सव मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पणत्या अकोले शहरातील प्रवरा नदीच्या कडेला प्राचिन सिद्धेश्वर मंदिर असून इथे कालभैरवाचेही स्वतंत्र मंदिर आहे. कालभैरव जयंतीच्या निमित्ताने इथे दरवर्षी दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. तसेच विविध धार्मिक कार्यक्रमही आयोजित केले जातात. याहीवर्षी पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पहाटे जलाभिषेक व महाआरती करण्यात आली. बाजरीची भाकरी व वांग्याचे भरीत म्हणून भाविक नैवैद्य दाखविण्याची परंपरा आहे. बुधवारी दिवसभर भाविकांनी नैवद्य मंदिरात दाखविण्याबरोबरच कालभैरवाष्टकाचे सामूहिक पठण केले. बटुकभैरव कवचाचेही पठण भाविक करीत होते. मंदिराला आकर्षक अशा फुलांच्या माळांनी सजविण्यात आले होते. स्वामी समर्थ सेवेकरी मंडळींनी यामध्ये मोठ्या हिरीरीने भाग घेत विविध धार्मिक कार्यक्रम केले. या मंदिरात शनि महाराज व शीतलादेवी यांचेही भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले. सिद्धेश्वर मंदिरातही भाविकांनी शिवलीला अमृताचेही पठण केले. सिद्धेश्वर मंदिर हे एक शिल्पकलेचा उत्तम नमुना असून सायंकाळच्या आरतीनंतर पणत्या प्रज्वलित करून दीपोत्सवाला सुरुवात करण्यात आली. सर्व पणत्या प्रज्वलित झाल्यावर हे दृश्य पाहण्यासाठी अकोलेकरांनी मोठी गर्दी केली होती. हे दृश्य आपल्या डोळ्यात सामावून घेत असताना मोबाईलमध्येही फोटो घेतानाची स्पर्धाच जणू इथे पाहायला मिळाली.

# नर्सरी ते राहुरी फॅक्टरी रस्ता निकृष्ट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : राहुरी ते राहुरी फक्टरी दरम्यानच्या रस्त्यांचे डागडुजी व खड्डे बुजविण्याचे काम केले जात आहे. सदरचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते संजय राजळे यांनी केली आहे. राजळे म्हणाले की,श्रीरामपूर-बेलापूर ते राहुरी फक्टरी या रस्त्याचे डागडुजीचे काम केले जात आहे.बेलापूर ते नर्सरी या सा.बांधकाम श्रीरामपूर उपविभागाच्या अख्त्यारीतील भागाचे काम व्यवस्थित करण्यात आले. मात्र राहुरी उपविभागाच्या अख्त्यारितील नर्सरी ते राहुरी फक्टरी या अंतरातील भागाचे डागडुजीचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे.तरी सदर तक्रारीची संबंधितांनी दखल घेवून ठेकेदारास योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी राजळे यांनी केली आहे.

# मर्चंट असोसिएशनच्या अध्यक्षपदी कोठारी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर** : येथील श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनच्या अध्यक्षपदी राहुल रमेश कोठारी, उपाध्यक्षपदी अनिल लुल्ला, सचिवपदी संजय कासलीवाल, सहसचिवपदी नंदकुमार कोठारी यांची एकमताने निवड करण्यात आली. मर्चंट असोसिएशन श्रीरामपूर या संस्थेचे मावळते अध्यक्ष गौतम उपाध्ये यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी निवडीसाठी संचालक मंडळाची बैठक झाली होती.

यावेळी अध्यक्षपदासाठी राहुल कोठारी यांच्या नावाची सुचना निलेश बोरावके यांनी केली त्याला प्रविण गुलाटी यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी अनिल लुल्ला यांच्या नावाची सुचना निलेश नागले यांनी केली त्याला नंदुशेठ कोठारी यांनी अनुमोदन दिले. सचिवपदी संजय कासलीवाल यांच्या नावाची सुचना दत्तात्रय धालपे यांनी केली त्याला गौतम उपाध्ये यांनी अनुमोदन दिले. सहसचिवपदी नंदुशेठ कोठारी यांच्या नावाची सुचना स्वप्नील चोरडीया यांनी केली त्याला बाळासाहेब खाबिया यांनी अनुमोदन दिले.

नुतन अध्यक्ष राहुल कोठारी यांनी संचालक मंडळाने नुतन पदाधिकाऱ्याची निवड करुन आमच्या वर जो विश्वास दाखवला या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या हिताचे कार्य करुन व नावलौकीक वाढविण्यात येईल, असा मनोदय यावेळी व्यक्त केला.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराजमध्ये नगर राज्यात नंबर वन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मुख्यमंत्री पंचायत राज अभियानात नगर जिल्हा परिषद व प्रत्येक तालुक्यातील ग्रामपंचायतींनी जोरदार होमवर्क सुरु केले आहे. अभियानातील प्रत्येक गावच्या ग्रामपंचायतींनी ऑनलाईन प्रोफाईल नोंदणीसह अभियानाच्या पूर्व प्रश्नावलीचे ९८.४८ टक्के काम केल्याने नगर जिल्हा परिषद ही राज्यात पहिल्या क्रमांकावर झेपावली आहे.

जिल्ह्यातील ग्रामपंचायती आणि पंचायत समित्याने या कामात सातत्य ठेवल्यास मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात नगर जिल्हा राज्यात अव्वल ठरणार आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात




महाराष्ट्रातील सर्व ३४ जिल्ह्यांच्या ग्रामपंचायतींच्या प्रोफाइल आणि पूर्व-प्रश्नावली भरण्याचे काम सध्या सुरू आहे. यात राज्यातील एकूण २७ हजार ९५८ ग्रामपंचायतींपैकी १९ हजार ७१४ (७०.५१ टक्के) ग्रामपंचायतींनी प्रोफाइल भरलेले असून फक्त ३ हजार ३२२ (११.८८ टक्के) ग्रामपंचायतींनी पूर्व-प्रश्नावली भरलेली आहे. यात अहिल्यानगर जिल्हा पहिल्यास्थानावर असून ९८.४९ टक्के, रत्नागिरी ९४.३३, नागपूर ९३.२०, बुलढाणा ९२.७६, रायगड ९१.७४, पालघर ९०.४९ आणि सिंधूदुर्ग ९०.२८ टक्के काम झालेले आहे.

राज्यभर ७० टक्क्यांपेक्षा जास्त ग्रामपंचायतींनी प्रोफाइल भरले आहेत. परंतु फक्त १२ टक्के ग्रामपंचायतींनी पूर्व-प्रश्नावली भरली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भंडारी आणि ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ हे या अभियानाच्या यशस्वीतेसाठी करत आहेत.

# श्रीरामपुरात 'उबाठा' चा स्वबळाचा नारा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर** : आगामी नगर निवडणुकीसाठी महाविकास परिषद श्रीरामपूरमध्ये आघाडीतील घटक पक्षांमध्ये मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने स्वबळावर लढण्याचा नारा दिलेला आहे. या निर्णयामुळे श्रीरामपूर शहर आणि तालुक्यात राजकीय वातावरण तापले असून, काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वाच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष सचिन कोते यांनी आज श्रीरामपूर येथे पत्रकार परिषदेत याबाबत अधिकृत माहिती दिली. स्थानिक काँग्रेस आमदार हेमंत ओगले, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे आणि जिल्हाध्यक्ष सचिन कोते, तालुकाध्यक्ष लखन भगत, जेष्ठ नेते अशोक थोर यांच्यात झालेल्या बैठकीनंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. ज्यात शिवसेना ठाकरे गटाने निवडणुकीत पूर्ण ताकदीने उतरण्याची तयारी केली आहे. तालुकाध्यक्ष लखन भगत यांनी दिलेल्या माहितीनुसार, नगराध्यक्षपदासह १७ प्रभागांसाठी एकूण ३४ उमेदवारांचे पूर्ण पॅनल उभे केले जाणार आहे. याचा अर्थ, दोन्ही मित्रपक्षांचे उमेदवार समोरासमोर निवडणूक लढवणार आहेत. महाविकास आघाडीतील दोन प्रमुख पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवत असल्याने, याचा थेट परिणाम काँग्रेसच्या संभाव्य विजयाच्या समीकरणांवर होण्याची शक्यता आहे. या मैत्रीपूर्ण लढतीमुळे मतांचे विभाजन होऊन, याचा मोठा तोटा महाविकास आघाडीला होण्याची शक्यता राजकीय तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. आगामी निवडणुकीत श्रीरामपूरमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळणार हे निश्चित आहे.

# युरियामिश्रीत गहू खाऊ घातला

## सात शेळ्यांचा मृत्यू; चौघांवर गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरालगतच्या अरणगाव शिवारातील मेहेरबाबा ट्रस्ट फॉरेस्ट परिसरात शेळ्यांना कोंडून ठेवून त्यांना युरियामिश्रित गहू खाऊ घालून विषप्रयोग केल्याचा प्रकार घडला आहे. यामुळे ७ शेळ्यांचा मृत्यू झाला असून, १३ शेळ्या व एक पिलू विकलांग अवस्थेत आहे.

या घटनेत शेळीपालक महिलेचे २ लाख ६७ हजार रूपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी अहिल्यानगर तालुक्यातील सोनेवाडी (चास) येथे राहणाऱ्या सुरेखा गोरख गव्हाणे (वय ३४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात बुधवारी (१२ नोव्हेंबर) चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुकाराम सदाशिव नाट, साक्षी तुकाराम नाट, सुनिता तुकाराम नाट व दत्ता साहेबराव नाट (सर्व रा. नाट मळा, अरणगाव, ता. अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. ही घटना १० नोव्हेंबर रोजी दुपारी ३:४० ते सायंकाळी ६:३० वाजताच्या दरम्यान घडली. फिर्यादी महिला शेळीपालनावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवते.

घटनेच्या दिवशी संशयित आरोपींनी फिर्यादीच्या शेळ्यांना व पिलांना अरणगाव शिवारातील नवीन बायपास रस्ता परिसरातील मेहेरबाबा ट्रस्टच्या फॉरेस्टमध्ये बेकायदेशीररित्या कोंडून ठेवले.

त्यानंतर संशयित आरोपींनी संगनमत करून शेळ्यांना युरियामिश्रित गहू खाण्यास दिला.




### अनेक शेळ्यांना आले विकलांग

या विषप्रयोगमुळे शेळ्या तडफडू लागल्या. यात तीन वर्षे वयाच्या चार मोठ्या शेळ्या आणि ५ महिन्यांची तीन पिले, असे एकूण ७ जनावरे ठार झाली. तर इतर १३ मोठ्या शेळ्या व एक लहान पिलू हे विषबाधेमुळे विकलांग अवस्थेत असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# शेतकऱ्यांना बारा तास वीज पुरवठा करावा

## बिबट्यांच्या वास्तव्याने शेतकऱ्यांमध्ये घबराट





**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शेतीसाठी वीजपुरवठा करण्याचे वेळापत्रक सध्या जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये शेतीसाठी रात्रीची वीज देण्यात आली आहे. यामध्ये रात्री दहा बारानंतर वीज पुरवठा जाहीर करण्यात आले आहे.

यामुळे जीव धोक्यात घालून शेतकऱ्यांना पाणी द्यावे लागत आहे. सध्या शेती शिवारात बिबट्यासह वन्यप्राण्यांचा वावर वाढला आहे. अनेकदा प्राण्यांचे शेतकऱ्यांवर जीवघेणे हल्ले होतात. सर्पदंश, विंचू दंश होत असतो. या पार्श्वभूमीवर दिवसा वीजपुरवठा हवा दिवसभर शेतात राबल्यानंतर पुन्हा रात्री कडाक्याच्या थंडीत आम्हाला गहू, हरभऱ्याला पाणी द्यायला जावे लागते आहे. हल्ल्यात अनेक शेतकऱ्यांनी आपला जीव देखील गमावला आहे. सरकारने शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज दिली पाहिजे ही रास्त अपेक्षा सरकारकडून आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. समाधानकारक पाऊस झाल्याने विहीर, नदी, नाल्यांसह बंधारेही भरले आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात रब्बी पिकांची म्हणजे गहू, मका, ज्वारी, हरबरा तसेच चाऱ्याची लागवड केली आहे. मात्र पिकांना पाणी देणे शेतकऱ्यांना अवघड झाले आहे. सिंचनाचे काम सुरू होताच ग्रामीण भागात वीज भारनिमयन सुरू होत आहे.शेतकऱ्यांना पिकांना सिंचनासाठी रात्रीचा दिवस करावा लागत असून त्रासलेल्या शेतकऱ्यांनी दिवसा वीजपुरवठा करण्याची मागणी अहिल्यानगर तालुक्यातील वाळकी, गुंडेगाव, रुई छत्तीशी, राळेगण, बाबुर्डी, खडकी, खंडाळा, वडगाव तांदळी येथील शेतकऱ्यांनी केली आहे. आठवड्यात एक-दोन दिवस दिवसा वीजपुरवठा होतो अन्यथा रात्री साडेअकरा ते सकाळी साडेसात या वेळेत वीजपुरवठा केला जातो.अशी वीज मिळत असल्याने शेतकऱ्यांना दिवसभर राबल्यानंतरही रात्री पाणी द्यायला शेतात जावे लागते.

दिवसा वीज नसल्याने त्याला रात्री जागरण करीत हरभरा, गहू पिकांना पाणी द्यावे लागते. रात्रभर शेतात उभे राहावे लागते. सध्या थंडीचा जोर वाढत चालला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना सिंचनाचे काम करताना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते.

शेतात पिकाला पाणी देण्यासाठी आम्ही शेतकरी रात्रभर जागे राहायचे रात्रीची लाईट देण्याचा जो कोणी हा निर्णय घेतला असेल तो आम्हा शेतकऱ्यांना वैरी समजत असावा.अशी रात्री शेतीला वीज देता रात्री बिबट्याची भिती, ट्रान्स्फॉर्मरवरील फ्यूज गेला तर तो टाकण्यासाठी खाजगी व्यक्ती किंवा स्वतः जावे लागते. आम्ही शेतकरी जीव धोक्यात घालून फ्यूज टाकावा लागतो. त्यामुळे दिवसा बारा तास लाईट पूर्ण वेळ द्यावी ही आमची मागणी आहे.
**कारभारी आगळे, शेतकरी, गुंडेगाव.**

# संपादकीय

## सांगावा बिहार निवडणूक निकालांचा

बिहारच्या विधानसभा निवडणुकीकडे सर्व देशाचे लक्ष लागले होते. मतदानाच्या दोन्ही टप्प्यांमध्ये नेहमीपेक्षा मतदान जास्त झाल्याचा लाभ कुणाला होणार याविषयी वेगवेगळे अंदाज बांधले जात होते. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाने मतदारांना आकर्षित केले. त्यांनी अनेक सुशिक्षित नवे चेहरे उमेदवार म्हणून उतरवले. त्यांच्या सभांना शहरी भागात मोठा प्रतिसाद लाभला. त्यामुळे ते निवडणुकीत किती मते मिळवतात आणि त्याचा भाजपाच्या व्होट बँकेवर किती परिणाम होऊ शकतो, यावर सत्तास्थापनेची समीकरणे आखली जात होती. मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत राज्यातील दिड कोटी महिलांच्या बँक खात्यात निवडणुकीच्या तोंडावर नितीशकुमार यांच्या सरकारने थेट दहा हजार रूपये जमा केल्यामुळे महिला आनंदी होत्या. महिला मतदारांचे भरघोस मतदान एनडीएच्या उमेदवारांना मिळेल, असा विश्वास नितिशकुमार यांच्या जनता दल युनायटेड पक्षाला आणि भाजपाला होता. हा विश्वास, महिला मतदारांनी दिलेली जोरदार साथ, यादव मतांचे एनडीएकडे झुकणे, तेजस्वी यादव आणि काँग्रेसच्या राज्यकारणाचा घसरलेला प्रभाव, ठसा उमटवू न शकलेले प्रशांत किशोर आणि एकूणच मोदींच्या राजकारणाला मतदारांनी दिलेली साथ हा बिहार निवडणुकीच्या निकालांचा सांगावा मानता येतो. खरे सांगायचे तर, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यापुर्वी विरोधी पक्षांच्या राज्यात निवडणुकीच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या सवलतींवर सडकून टीका केली होती. त्यांनी अनेकदा रेवडी संस्कृतीची खिल्ली उडवली. पण मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि हरयाणामध्ये तेथील भाजपा सरकारने राबवलेल्या ‘लाडकी बहिण’ योजनेने मात्र भाजपाला पुन्हा सत्ता मिळवून दिल्यापासून मोदींनी रेवडी वाटपावर टीका करणे बंद केले आहे. भाजपाने या तीन राज्यांमध्ये रेवड्या वाटून सत्ता मिळवली तसेच नितीशकुमार यांनी बिहारमध्ये निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री महिला रोजगार योजना जाहीर केली. महिलांना स्वयंरोजगार किंवा उद्योग सुरू करण्यासाठी ही योजना आहे. त्याची सुरूवात म्हणून दिड कोटी महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रूपये सरकारने जमा केले. राज्यातील कायम निवासी तसेच १८ ते ६० वयोगटातील महिलांसाठी ही योजना आहे, त्यांनी आपला रोजगार उद्योगाचा आराखडा सादर केल्यावर सहा महिन्यात आणखी दोन लाख रूपये देण्यात येणार आहेत. महाराष्ट्राप्रमाणे ‘लाडकी बहिण’ योजना सरसकट सर्व महिलांसाठी लागू केलेली नाही. २००६ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर नितीशकुमार यांनी महिलांसाठी ‘सायकल योजना’ सुरू केली. त्याचाही त्यांना लाभ झाला. महिला व्होट बँकेसाठी ‘सायकल ते दस हजारी’ असे त्यांच्या कारकिर्दीचे वर्णन केले जात आहे. नितीशकुमार यांनी राज्यात दारूबंदी जाहिर केली. त्याचे महिलांनी जोरदार स्वागत केले. त्याचाही लाभ नितीशकुमार यांना निवडणुकीत झाला. एकंदरीतच महिला व्होट बँक हा नितीशकुमार यांचा मोठा आधार असण्यावर शिक्कामोर्तब झाले.

हरयाणामध्ये महिलांना दरमहा २१०० रूपये आणि बेरोजगारांना दरमहा १२०० ते ३५०० रूपये देण्याचे आश्वासन भाजपाने निवडणुकीत दिले होते. महाराष्ट्रात लाडकी बहिण योजनेखाली दरमहा १५०० रूपये दिले जातात. निवडणुकीमध्ये मतदारांना विकासकामांपेक्षा थेट रेवड्या महत्वाच्या वाटतात हेच महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि हरयाणाने दाखवून दिले आहे. तेजस्वी यादव यांनी आपला पक्ष सत्तेवर आल्यास महिलांना दरमहा अडिच हजार रूपये देऊ, असे आश्वासन दिले होते. अतिमागास कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी देण्याचेही आश्वासन तेजस्वी यादव यांनी दिले होते, मात्र त्याचा लाभ झाल्याचे दिसत नाही. नितीशकुमार यांच्यावर राममनोहर लोहिया आणि जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा प्रभाव आहे. पण त्यांनी सत्तेसाठी कधी राष्ट्रीय जनता दल तर कधी भारतीय जनता पार्टी अशी अलटून पालटून युती केली. एनडीए सत्तेवर आल्यास पुन्हा नितीशकुमार मुख्यमंत्री होतील की भाजपा मुख्यमंत्रीपद आपल्याकडे घेईल, याबाबत मात्र सस्पेन्स पहायला मिळाला. इथे नमूद केले पाहिजे की, एनडीएचा निवडणूक जाहीरनामा घोषीत झाला तेव्हा तिथे नितीशकुमार हजर होते, पण पण केवळ तीस सेकंदांमध्ये पत्रकार परिषद संपली आणि सर्व नेते उठून गेले. एनडीएचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार कोण हा प्रश्न विचारला जाईल अशी त्यांना खात्री होती, त्याचे उत्तर टाळण्यासाठी प्रश्नोत्तरे होऊ न देताच पत्रकार परिषद संपवली गेली. पुढील काळात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्रकारांनी मुख्यमंत्री कोण होणार, असा प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी निवडून येणारे आमदार ठरवतील असे उत्तर दिले होते. नितीशकुमार यांना हे उत्तर आवडले नसावे. बिहारमध्ये पार पडलेल्या गेल्या सतरा निवडणुकांमध्ये पाच टक्के मतदान वाढले किंवा कमी झाले तर सत्ता परिवर्तन होते. बिहारमध्ये सवर्ण मतदारांची संख्या दहा टक्के इतकी आहे. त्या आधारावर भाजपा सत्तेपर्यंत पोहोचू शकत नाही. म्हणूनच नितीशकुमार यांची मदत घेतल्याशिवाय भाजपा या राज्याची सत्ता काबीज करू शकत नाही, हे वास्तव आहे. उत्तर भारतात बिहार हे एकमेव हिंदी भाषक राज्य आहे, जिथे भाजपाला आजवर आपला मुख्यमंत्री बसवता आलेला नाही. त्याचप्रमाणे कोणाच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवतो याला आता फारसे महत्व राहिलेले नाही. निकालानंतर विजयी आमदारांचे संख्याबळ काय असेल यावर मुख्यमंत्रीपद कोणाला मिळणार, हे ठरते असे भाजपचे म्हणणे राहिले आहे. बिहारमध्ये निवडणुकीच्या राजकारणातील नवे खेळाडू जनसुराज्य पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर हे यावेळी चिराग पासवान यांची भूमिका बजावतील, असे राजकीय विश्लेषकांना वाटत होते. प्रत्यक्षात मात्र तसे घडले नाही.राजकारणात तरूण नेतृत्व येते तेव्हा जुने आणि नव्यांचा संघर्ष तीव्र होत जातो. अलिकडच्या काळात लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव, प्रशांत किशोर किंवा सम्राट चौधरी अशा तरूणांचा बिहारच्या राजकारणात अधिक बोलबोला होता. मात्र मतदारांवर आर्थिक सवलतींचा मुबलक वर्षाव करत नितीशकुमार यांनी बाजी आपल्या नावे केली. आता बिहारमध्ये सुशासनाचा नवा अध्याय लिहिला जाईल, असा विश्वास बाळगायला हरकत नाही. फक्त या सुशासनातून सामान्य बिहारी माणसाच्या जीवनमानामध्ये फरक पडला पाहिजे. अन्यथा बिहारींचे रोजगारासाठी पलायन, बिहारी म्हणून सतत हिणवले जाणे कायम राहील.

# स्वदेशी अभियानातून वस्त्रोद्योगाला उभारी

विशेष

– प्रा. सुखदेव बखळे



अमेरिकेने भारतावर निर्बंध घातल्याचा परिणाम जाणवू नये, म्हणून केंद्र सरकारने जसा अन्य देशांशी व्यापार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे, त्याच प्रकारे देशांतर्गत बाजारात उठाव वाढावा म्हणून जीएसटी करांची फेररचना केली. त्याचबरोबर स्वदेशी अभियानाच्या माध्यमातून देशातील वस्तूंची खरेदी वाढावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचा वस्त्रोद्योगाला मोठा आधार मिळाला आहे. वस्त्रोद्योग क्षेत्रातील या भरारीचा वेध.

केंद्र सरकारने देशभरात स्वदेशी मोहीम सुरू करण्याची घोषणा केली आहे. या मोहिमेचा उद्देश हातमाग, हस्तकला आणि घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवणे हा आहे. विशेषतः शहरी तरुणांमध्ये आणि ‘जनरेशन झेड’ वर या अभियानाचा परिणाम झाला, तर भारतात देशांतर्गत उत्पादित कापडाची मागणी दर वर्षी नऊ–दहा टक्क्यांनी वाढेल आणि २०३० पर्यंत ती २५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल. वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या मते, २०२४ मध्ये भारताची कापड आणि वस्त्रोद्योग बाजारपेठ १७९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. गेल्या वर्षी तिचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे सात टक्के होता. देशातील उत्पादित कापडाचा देशांतर्गत बाजारपेठेतील वाटा ५८ टक्के आहे आणि तो अंदाजे ८.१९ टक्क्यांनी वाढत आहे. परदेशातून आयात केलेल्या कपड्याचा वापर २१ टक्के असून वार्षिक ६.७९ टक्क्यांनी वाढत आहे. घरगुती कापड उत्पादनांची मागणी वाढवण्यासाठी तरुणांना आणि शहरी वर्गाला सहभागी करून घेण्याचे महत्त्व या आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतीय कापडांना तरुणांमध्ये अभिमान आणि शैलीचे प्रतीक बनवणे, हा स्वदेशी मोहिमेमागील प्राथमिक उद्देश आहे. या उपक्रमामुळे केवळ तरुण ग्राहकांमध्ये स्वदेशी उत्पादनांची स्वीकृती वाढणार नाही, तर वीणकर, कारागीर आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) उत्पन्न आणि बाजारपेठेच्या संधीदेखील वाढतील. या उपक्रमांतर्गत विविध मंत्रालये, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्स आणि शैक्षणिक संस्थांना त्यांच्या कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी गणवेश आणि सजावटीमध्ये भारतीय बनावटीचे कापड स्वीकारण्यास प्रोत्साहित केले जाईल.

सरकारच्या ताज्या निवेदनानुसार स्वदेशी मोहीम उत्पादन–आधारित प्रोत्साहन योजना, ‘पीएम मित्र पार्क’ आणि ‘एक जिल्हा एक उत्पादन उपक्रम’ यासह विद्यमान कार्यक्रमांना पूरक ठरेल. ही मोहीम ‘सोशल मीडिया’, राज्यस्तरीय भागीदारी आणि जनजागृती कार्यक्रमांद्वारे तरुणांपर्यंत पोहोचेल. याव्यतिरिक्त, जीएसटी दरांमध्ये अलिकडच्या काळात झालेल्या बदलांमुळे देशांतर्गत आणि बिगर–देशांतर्गत वापर वाढेल. यामुळे देशात कापड आणि कपड्यांची मागणी वाढू शकते. मंत्रालयाने या मोहिमेचे केंद्रबिंदू म्हणून विशेषतः शहरी तरुणांना आणि ‘जनरेशन झेड’ पिढीला लक्ष्य केले आहे. भारतीय कापड परिधान करणे केवळ पारंपारिकच नाही, तर स्टायलिश आणि फॅशनेबलदेखील असू शकते हे त्यांना दाखवणे हा यामागील उद्देश आहे. या उपक्रमामुळे तरुणांना स्थानिक कारागीर आणि विणकरांना पाठिंबा देण्यासाठी प्रेरणा मिळेल. स्वदेशी मोहिमेमुळे केवळ ग्राहकांना फायदा होणार नाही, तर लघु आणि मध्यम उद्योग तसेच हस्तकला उद्योगांना रोजगार आणि बाजारपेठेत प्रवेश वाढण्याची संधी मिळेल. वीणकर आणि कारागीरांना आपली उत्पादने थेट ग्राहकांना विकण्याची संधी मिळेल. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होईल. अशा उपक्रमांमुळे केवळ कापड उद्योगाला चालना मिळणार नाही, तर स्वदेशी उत्पादनांची जागतिक मान्यता मजबूत होईल. एकंदरीत, स्वदेशी मोहीम ही एक महत्त्वपूर्ण पायरी आहे, जी २०३० पर्यंत देशांतर्गत कापडाची मागणी २५० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्यास मदत करेल.

तरुणाई आणि ‘जनरेशन झेड’चा सहभाग, सरकारी पाठिंबा, ‘एमएसएमई’कडून मिळणारा पाठिंबा आणि ‘सोशल मीडिया मोहिमा’ या उपक्रमाला यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. भारताचा कापड उद्योग आता फक्त कपडे बनवण्यापुरता मर्यादित नाही, तर तो नवोपक्रम आणि शाश्वततेकडे एक मोठा बदल म्हणून पहात आहे. पर्यावरणपूरक कापड, डिजिटल तंत्रज्ञान आणि पुनर्वापर वाढत आहे. त्याचा पर्यावरण रक्षणालाही फायदा होत आहे. कापड उद्योग आता नवीन तंत्रज्ञान आणि ‘ग्रीन थॉट’सह भविष्याकडे वाटचाल करत आहे. नवोपक्रम उद्योगाचा चेहरामोहरा बदलत आहे. कापड उद्योग जुन्या पद्धतींपेक्षा पुढे जात आहे आणि स्मार्ट कापड आणि शाश्वत उत्पादन तंत्रांचा अवलंब करत आहे. कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्ता, थ्री डी प्रिंटिंग आणि ‘बायोफॅब्रिकेशन’सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करत असल्यामुळे कपडे चांगलेच नाहीत, तर पर्यावरणपूरकदेखील बनत आहेत. डिजिटल रंगकारी आणि पाणीरहित प्रक्रिया यासारख्या तंत्रज्ञानामुळे आता कापड उत्पादनात पाणी आणि रसायनांचा वापर कमी होत आहे. फॅशन उद्योगावर वाढत्या पर्यावरणीय दबावामुळे, ब्रँड आता शाश्वत कापडांवर भर देत आहेत. पुनर्वापर केलेले पॉलिस्टर, सेंद्रिय कापूस आणि बांबू किंवा जूटसारखे नैसर्गिक तंतू नवीन पर्याय बनत आहेत. शिवाय, अनेक कंपन्या सर्क्युलर फॅशन मॉडेल स्वीकारत आहेत. ते जुन्या कपड्यांचे नवीन कपड्यांमध्ये पुनर्वापर करतात. हा उपक्रम केवळ पर्यावरणाचे रक्षण करत नाही, तर ग्राहकांना जबाबदार खरेदी करण्यास प्रेरित करतो.

भारत जगातील सर्वात मोठ्या कापड उत्पादकांपैकी एक असून शाश्वत कापडनिर्मिती आणि व्यवहाराकडे वेगाने वळत आहे. सरकार ‘मेक इन इंडिया’ आणि ‘टेक्सटाइल पार्क’सारख्या योजनांद्वारे हरित उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. निर्यात क्षेत्रातही शाश्वत कापडांची मागणी वाढत आहे. त्यामुळे भारताला मजबूत पाय रोवता येत आहेत. भविष्यात भारतीय कापड उद्योग आर्थिकदृष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणीयदृष्ट्याही जागतिक स्तरावर आघाडीची भूमिका बजावण्यास सज्ज आहे. कापड उद्योगाचे भविष्य आता नवोपक्रम, शाश्वतता आणि तंत्रज्ञानाच्या नवीन अंतर्विरोधाशी जोडले आहे. हा बदल केवळ फॅशनची दिशा बदलत नाही, तर पृथ्वीचे भविष्यदेखील सुरक्षित करत आहे. ‘ग्रीन फॅशन’चा ट्रेंड वाढला आहे. परिणामी, निसर्गावर आधारित कपड्यांची मागणी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. भारतासह पाच देशांनी नैसर्गिक साहित्यापासून बनवलेले कपडे वेगाने स्वीकारले आहेत. आंतरराष्ट्रीय अहवाल आणि अभ्यासातून दिसून आले आहे, की लोक आता ‘ब्रँडेड ग्लिट्झ’पासून दूर जात असून सभोवतालच्या साहित्यांसह फॅशनची व्याख्या नव्याने लिहीत आहेत. जुने कपडे, ज्यूट, बांबू, पाने, पुनर्वापर केलेले कापड आणि नैसर्गिक रंगाच्या वापरावर भर दिला जात आहे. हा ट्रेंड केवळ पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक ठोस पाऊल नाही, तर रासायनिक कापड आणि मायक्रोप्लास्टिकने भरलेल्या कपड्यांना जागतिक प्रतिसाददेखील बनत आहे.

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनईपी) आणि ‘ग्लोबल फॅशन अजेंडा’ यांच्या ‘द स्टेट ऑफ सर्क्युलर फॅशन’ या संयुक्त अहवालानुसार स्वीडन, फ्रान्स, जपान, कॅनडा आणि भारत हे सर्वात वेगाने शाश्वत किंवा निसर्गअनुकूल फॅशन स्वीकारणारे आघाडीचे पाच देश आहेत. ‘फॅशन थिअरी: द जर्नल ऑफ ड्रेस, बॉडी अँड कल्चर’मध्ये प्रकाशित झालेल्या या अहवालात म्हटले आहे, की २०१४ ते २०२४ या कालावधीत या देशांमध्ये निसर्गावर आधारित कापडांची (हिरवे कपडे) मागणी सरासरी ४३ टक्क्यांनी वाढली आहे. सर्वात लक्षणीय बदल स्वीडनमध्ये दिसून आला. तेथिल ‘एलेन मॅकआर्थर फाउंडेशन’च्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२४ दरम्यान पुनर्नविनीकरण केलेल्या किंवा सेंद्रिय कपड्यांच्या विक्रीत ६१ टक्के वाढ झाली. ‘इंटरनॅशनल जर्नल ऑफ सस्टेनेबल फॅशन अँड टेक्सटाईल्स’मध्ये प्रकाशित झालेल्या दुसऱ्या अहवालानुसार, नैसर्गिक संसाधनांचे पुनर्नविनीकरण आणि कापडांचा पुनर्वापर यावर आधारित ‘रिजनरेटिव्ह फॅशन’ या मॉडेलने गेल्या पाच वर्षांमध्ये जागतिक शहरी फॅशन बाजारपेठेत लक्षणीय स्थान मिळवले आहे. स्टॉकहोम, पॅरिस, टोकियो, न्यूयॉर्क, सेऊल, मुंबई, सिडनी, बर्लिन, ॲमस्टरडॅम, टोरंटो, सिंगापूर आणि मेलबर्न या बारा प्रमुख शहरांमध्ये केलेल्या सर्वेक्षणात आढळून आले, की अंदाजे ३८ टक्के ग्राहक आता फक्त पुनर्नविनीकरण केलेले किंवा नैसर्गिक स्रोतांपासून बनवलेले कपडे खरेदी करण्यास प्राधान्य देतात. जुन्या वस्तूंचा पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे.

अहवालानुसार अलिकडच्या काळात ‘अपसायकलिंग’, जुन्या किंवा टाकून दिलेल्या वस्तूंचे पुनर्वापर करणे हा एक फॅशन ट्रेंड बनला आहे. पॅरिस, मिलान आणि टोकियो येथील फॅशन शोमध्ये, डिझायनर्स आता जुन्या जीन्स, उरलेल्या धाग्यापासून आणि कापडाच्या तुकड्यांपासून नवीन कपडे तयार करत आहेत. भारतात दिल्ली, जयपूर आणि मुंबईमधील तरुण डिझायनर्स नैसर्गिक रंग, खादी, हातमाग यांच्या माध्यमातून जुने कापड वापरुन नवे कपडे तयार करत आहेत. या सर्वांचा परिणाम प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय वस्त्रोद्योगाला सावरण्यास मदतकारक होत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

पान १ वरून

## युतीची चिंता करू नका, निवडणूक लढवा

विश्वास ठेवत आलेल्या नगरसेवकांना पुन्हा निवडून आणणे ही जबाबदारी प्रत्येक आमदार व खासदाराने स्वीकारावी.

शिंदेंनी मुंबईतील घरकुलाच्या समस्येवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे संकेत दिले. मुंबईत स्वतःचे घर मिळावे ही प्रत्येक मुंबईकराची इच्छा आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात धोरणात्मक कामे सुरू आहेत, असे त्यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. मतदानाच्या वेळी घरकुल, पुनर्विकास, क्लस्टर प्रकल्प, कोस्टल रोड आणि मेट्रोसारख्या विषयांवर जनतेशी संवाद साधण्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच, जो विश्वास ठेवून त्यांच्या नेतृत्वासोबत उभा राहिला त्या नगरसेवकांना पुन्हा प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे शिंदेंनी ठामपणे सांगितले.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाचा त्याग करून शिंदे गटासोबत आलेल्या नगरसेवकांना युतीत योग्य जागा मिळवून देणे आणि त्या सर्वांना जिंकवून आणणे ही जबाबदारी पूर्णपणे आमदार आणि खासदारांच्या खांद्यावर दिली आहे. यामुळे या निवडणुकीत खासदार–आमदारांना प्रभागनिहाय रणनीती आखावी लागणार आहे. निवडणुकीत भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची युती असल्याने जागावाटप कसे होणार यावर अजूनही चित्र स्पष्ट नाही. मात्र शिंदेंनी स्पष्ट केले की, युतीचे तांत्रिक निर्णय वरिष्ठ नेते घेतील आणि पदाधिकाऱ्यांनी आपल्या क्षमतेनुसार काम करत राहावे.

## शेतकरी आंदोलनाला हिंसक वळण

शेतकऱ्यांनी आग लावली नाही. त्यांच्या मते, कारखान्याशी संबंधित लोक पोलिसांसमोरच आग लावत होते. आमचे लोक आणि काही पोलिस जखमी झाले, ते म्हणाले. पोलिसांच्या वाहनावरही हल्ला करण्यात आला. शेतकऱ्यांना बदनाम करण्यासाठी आग लावण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या घटनेनंतर, बागलकोटच्या उपायुक्तांनी बीएनएसएस–२०२३ च्या कलम १६३ अंतर्गत आदेश जारी केले, ज्यात १३ नोव्हेंबर रोजी रात्री ८ ते १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत जमखंडी, मुधोळ आणि रबकवी–बनाहट्टी तालुक्यांमध्ये निदर्शने, संप आणि कोणत्याही मेळाव्यावर बंदी घालण्यात आली. सध्या ऊस उत्पादक शेतकरी आणि सरकारमध्ये दरावरून वाद सुरू आहे. मुधोळचे शेतकरी प्रति टन ३,५०० रुपयांच्या मागणीवर ठाम आहेत, तर गेल्या आठवड्यात बेळगावीतील शेतकऱ्यांनी ३,३०० रुपयांना होकार दिला. या मुद्द्याचा निषेध करण्यासाठी शेतकरी ट्रॅक्टर, बैलगाड्या आणि ऑटो–रिक्षांचा वापर करून मोठ्या रॅली काढत रस्त्यावर उतरले. ७ नोव्हेंबरपासून बागलकोट, मुधोळ आणि आसपासच्या भागात शेतकरी रस्ते अडवत आहेत आणि मोर्चे काढत आहेत. १३ नोव्हेंबर रोजी त्यांनी गोदावरी (समीरवाडी) साखर कारखान्याला घेराव घातला, जिथे काही लोकांनी ऊस वाहून नेणाऱ्या ट्रॅक्टरना आग लावली. बेळगावीतील शेतकऱ्यांनी प्रति टन ३,३०० रुपयांच्या सरकारी दराला मान्यता दिली आहे, परंतु बागलकोट आणि हवेरीतील लोक अजूनही ते दिशाभूल करणारे म्हणतात. त्यांचे म्हणणे आहे की वसुलीच्या आधारे दर निश्चित करणे शेतकऱ्यांसाठी हानिकारक आहे. भाजप नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते आर. अशोक म्हणाले की, शेकडो टन ऊस आणि लाखो रुपयांचे ट्रॅक्टर जळताना पाहून मन हेलावून जाते. काँग्रेस सरकारवर दुर्लक्ष केल्याचा आरोप करत त्यांनी शेतकऱ्यांना भरपाई देण्याची आणि मुख्यमंत्र्यांशी थेट संवाद साधण्याची मागणी केली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष बी.वाय. विजयेंद्र यांनीही सरकारवर हल्लाबोल केला आणि म्हटले की, शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त आहेत, परंतु सरकार साखर कारखानदारांच्या दबावाखाली आहे.७ नोव्हेंबर रोजी हत्तरगी टोल प्लाझाजवळ झालेल्या निदर्शनादरम्यान दगडफेकीप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिस अधीक्षक भीमाशंकर गुलेद यांच्या मते, हे व्यक्ती शेतकरी नव्हते तर निदर्शने उधळण्यासाठी आले होते. व्हिडिओ फुटेजद्वारे त्यांची ओळख पटवण्यात आली. त्यांच्याविरुद्ध बीएनएस कायद्यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

## रस्त्यांचे सुरक्षा ऑडिट करा

सुरक्षित बनवणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी मांडले.

या पोस्टमध्ये सुळे यांनी नऱ्हे ते रावेत या मार्गावरील एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या कामाचा मुद्दाही उपस्थित केला. या मार्गासाठी मंजुरी मिळूनही प्रत्यक्ष काम सुरू झाले नसल्याचे त्यांनी सांगितले. नवले पूल परिसरात वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने एलिव्हेटेड मार्ग केवळ पर्याय नाही तर अत्यावश्यक गरज बनली आहे. या प्रकल्पामुळे अपघातांचे प्रमाण कमी होऊन वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. एलिव्हेटेड मार्ग सुरू झाल्यास मोठ्या प्रमाणावर रस्त्यावरील दबाव कमी होऊन पर्यायी मार्ग उपलब्ध होतील, असे त्यांनी नमूद केले.

खासदार सुळे यांनी केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना या संदर्भात नम्र विनंती केली आहे. नऱ्हे ते रावेत दरम्यानच्या एलिव्हेटेड मार्गाचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला द्याव्यात, अशी विनंती त्यांनी पोस्टमध्ये केली. तसेच, रस्ते सुरक्षेसाठी राष्ट्रीय स्तरावर एक विशेष मोहिम राबवण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले. अपघात टाळण्यासाठी वेग मर्यादा, वाहतूक चिन्हे, रस्त्यांची दुरुस्ती आणि जागरूकता मोहिमा प्रभावीपणे राबवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

नवले पूल परिसरातील हा अपघात रस्ते सुरक्षा या विषयाला पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणून ठेवत आहे. पुण्यासह राज्यातील अनेक महामार्ग शहरांच्या अगदी जवळून जातात. अशा ठिकाणी वाहतुकीची घनता जास्त असल्याने अपघाताची शक्यता कायम असते. त्यामुळे शहरांच्या जवळील रस्त्यांचे सखोल सुरक्षा ऑडिट केले तर संभाव्य जोखीम वेळेत ओळखता येईल. तसेच, रस्ते सुरक्षित करण्यासाठी योग्य उपाययोजना करता येतील. नागरिकांच्या सुरक्षेसाठी केंद्र आणि राज्य सरकारने एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. सुप्रिया सुळे यांनी केलेल्या मागण्यांमुळे या मुद्द्याला वेगळी गती मिळू शकते आणि पुण्यातील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

नवले पूल येथे काल झालेला अपघात अतिशय दुर्दैवी आहे. या घटनेत काही नागरीक मृत्युमुखी पडले तर अनेक जण जखमी झाले. यापुर्वीही येथे झालेल्या अपघातात जिवितहानी झाली आहे. हे रोखण्यासाठी नऱ्हे ते रावेत या मंजूर असलेल्या एलिव्हेटेड मार्गासह इतर एलिव्हेटेड मार्गांचे काम तातडीने सुरु करण्याची गरज आहे.

पान १ वरून

## व्होट चोरीचा आरोप करणाऱ्यांची धोबीपछाड

दुर्दैवी होते. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची झालेली वाताहात पाहाता राहूल गांधी यांनी आता परदेशात जावून देशाच्या लोकशाही व्यवस्थेवर टिका करण्यापेक्षा स्वता:च्या पक्षाच्या अस्तित्वासाठी काम करण्याचा टोला मंत्री विखे पाटील यांनी लगावला.

## इंदुरीकर महाराजांना ठोंबरेंची साथ

सुरू झाल्याने इंदुरीकर महाराज मानसिक तणावात असल्याचे दिसून आले. अखेर एका कीर्तनात त्यांनी या प्रकरणाबद्दल मनातील वेदना व्यक्त करत कीर्तन सोडण्याचा विचार जाहीर केला. त्यामुळे त्यांच्या भक्तांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

या संपूर्ण घडामोडीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी समर्थकांचा सूर छेडत इंदुरीकर महाराजांना धीर देणारी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी फेसबुकवर लिहिलेल्या पोस्टमध्ये महाराजांना फेटा खाली ठेवू नका असा भावनिक संदेश दिला. रूपाली ठोंबरे पाटील यांनी म्हटले की, पुढे बोलताना रूपाली ठोंबरे पाटील यांनी इंदुरीकर महाराजांवर होत असलेल्या टीकेचा जोरदार निषेध केला. अशा लोकांच्या शब्दांना किंमत देऊ नका, कारण ते समाजात अफवा आणि नकारात्मकता पसरवतात, असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराजांना उद्देशून त्या म्हणाल्या की, तुम्ही घराघरात हरवलेल्या माणसांना योग्य मार्ग दाखवला आहे. तुमच्यासारखे लोक नसतील तर अनेकांचे आयुष्य अंधारात जाईल. तुमच्यासाठी महाराष्ट्र उभा आहे. तुम्ही डगमगू नये हीच आमची इच्छा. तसेच स्वतःला इंदुरीकर महाराजांच्या कुटुंबातील लेक म्हणत त्यांनी महाराजांना भावनिक आधार दिला.

दरम्यान, इंदुरीकर महाराजांनी कीर्तनात मांडलेली वेदना अनेकांना चटका लावून गेली. लोक आता माझ्या मुलीच्या कपड्यांवरून कमेंट्स करत आहेत. तुम्हाला माझ्यावर टीका करायची असेल तर करा, पण माझ्या मुलांवर टीका नका करू, असे ते म्हणाले होते. ३१ वर्षे कीर्तनातून समाजसेवा करूनही आता व्यक्तीगत जीवनावर हल्ले होत असल्याने ते व्यथित असल्याचे त्यांनी सांगितले. मी दोन–तीन दिवसांत मोठा निर्णय घेईन, असे त्यांनी जाहीर करताच भक्तांमध्ये खळबळ उडाली. महाराज कीर्तन थांबवणार का? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

## डॉ. साठेंसह साळवेंचे पूर्णाकृती पुतळे उभारणार

अनावरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी अंकुश मोहिते, सुरेश भाऊ बनसोडे, धनंजय जाधव, सुनील उमाप, अशोक गायकवाड, विजय पठारे, जय भोसले, चंद्रकांत काळोखे, सिद्धार्थ आढाव, भारत पवार, पप्पू पाटील, राम काते, राम वडागळे, विशाल चांदणे, प्रकाश वाघमारे, अश्विन खुडे, अजय पठारे, सागर साठे, बाबू पचाराने, चेतन शेलार, विजय वडागळे, संजय खामकर, शाहु वडागळे, दादा पेटारे, आकाश औटि, रणजित वैरागर, येशूदास वाघमारे, संजय दिवटे, सुभाष वाघमारे, प्रदिप वावरे, प्रकाश घोरपडे, योगेश सोनवणे, सुनील सकट, सनी लोखंडे, राजू घोरपडे, साहेबराव काते, बंटि साबळे, पप्पू पाथरे, अनिकेत भोसले, अजय त्रिभुवन, संपत ठोकळ, लखन घोरपडे, दिपक सरोदे, विशाल वाघमारे आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. नामकरण सोहळ्यानंतर लहुजी वस्ताद यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## श्रीरामपूर अपघात; तरुण जागीच ठार

अपघात एवढा भीषण होता की गाडीने धडक दिलेल्या लोखंडी पोलचे २ तुकडे झाले. एवढेच नव्हेतर या जोरदार अपघातामुळे गाडीचे इंजिन डायरेक्टर रस्त्यावर पडले होते. यात सुमीत विजय दळवी, वय–३२ याचा जागीच मृत्यू झाला. लग्नाचे नवीन घातलेल्या कपड्यातच सुमीत याचा मृतदेह रस्त्यावर पडल्याचे चित्र अत्यंत हृदयद्रावक होते.

या अपघाताची माहिती कळताच सपोनि. समाधान सोळंके हे घटनास्थळी गेले. या ठिकाणी गाडीत असणारे अन्य दोघे गंभीर जखमी झालेले असल्याने त्यांना सुरूवातीला साखर कामगार रूग्णालय येथे नेण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी लोणी येथील रूग्णालयात नेण्यात आले. येथे त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

## श्रीरामपूर नगरपरिषदेसाठी अर्ज दाखल प्रक्रियेला वेग

आणि नगरसेवक पदांची निवडणूक आणखी चुरशीची आणि रोमहर्षक होण्याचे संकेत मिळत आहेत.

शहरात सध्या चर्चांना आणि गाठीभेटींना वेग आला असून, कोणत्या उमेदवाराकडे कोण झुकते माप देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणूक सुत्रांच्या माहितीनुसार, अर्ज छाननीनंतरच खरा उत्साह शिगेला पोहोचेल, असेही बोलले जात आहे. आगामी काही दिवस निर्णायक ठरणार असून राजकीय वातावरणात आणखी रंगत वाढण्याची पूर्ण शक्यता आहे.

## नगरमध्ये बिहारच्या निवडणूक विजयाचा जल्लोष

फटाके वाजवून व नागरिकांना पेढे वाटून बिहारच्या निवडणूक विजयाचा जल्लोष साजरा केला. यावेळी भाजपच्या, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या जयजयकाराच्या जोरदार घोषणा देण्यात आल्या.

यावेळी मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ, माजी सरचिटणीस प्रशांत मुथा व सचिन पारखी, वसंत लोढा, संतोष गांधी, बाळासाहेब खताडे, पियुष तावरे, पंडित वाघमारे, डॉ. दर्शन करमाळकर, राजू वाडेकर, राजेंद्र दळवी, बंटी बद्रे, मुकेश दिवाने, सुरेखा जंगम, अविनाश वाणी, दीपक देरेकर, अमित पखले, अजय ढवळे, विजय एडके, कपिल सुडके, अनुप पडोळे, अतुल जोशी, सुजित बळकट, आदिनाथ येंडे, सुनील तावरे व ज्ञानेश्वर भांगे आदी उपस्थित होते.

प्रशांत मुथा म्हणाले, बिहारमधील डबल इंजिन सरकारने जो विकास केला त्यामुळेच निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएने मोठे बहुमत मिळवले आहे. भाजपवर खोटे आरोप करणाऱ्या काँग्रेस व इतर विरोधकांना तेथील जनतेने चांगलीच धूळ चारली आहे. यावेळी वसंत लोढा, सचिन पारखी यांनीही मनोगत व्यक्त केले.

# कोपरगावच्या राजकारणात मोठी उलथापालथ

## आ. आशुतोष काळेंकडून कोयटेंची उमेदवारी जाहीर; कोल्हे गटही देणार टक्कर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगावच्या राजकारणात सध्या मोठी उलथापालत होत आहे. आ. आशुतोष काळे यांनी काका कोयटे यांचे नाव नगराध्यक्षपदासाठी फायनल केलेले आहे. ओबीसींची मते वळविण्यासाठी ही खेळी केली असल्याची चर्चा आहे. तर दुसरीकडे कोल्हे गटानेही तोडीस तोड उमेदवार देण्याची तयारी सुरू केली आहे.

आपल्या भात्यात ठेवलेला बाण ते ऐनवेळीस काढू शकतात. त्यामुळे कोपरगावच्या राजकारणात उलथापालथ होण्याची दाट शक्यता आहे. कोपरगावात कृष्णाई मंगल कार्यालयातून झालेला ''राजकीय स्फोट'' अद्याप शहराच्या हवेत घुमतो आहे. वेट अँड वॉचच्या भूमिकेत असलेले आमदार आशुतोष काळे यांनी अचानक काका कोयटे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश जाहीर केला आणि त्याचवेळी नगराध्यक्ष पदासाठी त्यांचे नाव घोषित करताच संपूर्ण राजकीय पट हलला.




हा प्रवेश म्हणजे केवळ एका नेत्याचा पक्षप्रवेश नाही तर कोपरगावच्या राजकारणातल्या दशकभराच्या स्थिर समीकरणांवर घातलेला बॉम्बस्फोट आहे. गेल्या निवडणुकांमध्ये कोल्हे गटाची एकछत्री सत्ता होती. पण आता काका कोयटे या नावानं त्या सत्तेच्या पायावर पहिला भूकंप घडवला आहे. २००१ च्या निवडणुकीतील ३१ मतांच्या पराभवानंतरही कोयटे यांनी गावाशी नाळ तुटू दिली नाही.

### नागरिकांना आठवल्या जुन्या आठवणी

कोपरगावच्या एका बँकेच्या चेअरमन यांनी राजकारणात उडी घेतली होती. सदरची बँक नागरिकांच्या विश्वासास पात्र ठरली होती. परंतु चेअरमन राजकारणात गुंतल्याने बँकेचे तीन तेरा आणि नऊ बारा वाजले. शेवटी बँक डबघाईस आल्याने बंद पडली. आजही अनेक नागरिकांच्या ठेवी या बँकेत अडकलेल्या आहेत. याचीच पुर्नआवृत्ती आता होवू नये, अशी जनतेमधून प्रतिक्रीया उमटत आहे.

पतसंस्था, उद्योगसमूह, सामाजिक उपक्रम या सगळ्यातून त्यांनी सातत्याने आपली उपस्थिती जपली. आज त्यांच्या त्या कष्टांची राजकीय फळं मिळाल्याचं दृश्य कृष्णाई मंगल कार्यालयात दिसलं काळे यांनी उमेदवारी जाहीर करताच कार्यकर्त्यांच्या घोषणा कोल्हे गटाच्या छातीत काट्यासारख्या खुपल्या. काका कोयटे यांनी भाषणात स्पष्ट सांगितलं ''आता माझं आयुष्य केवळ कोपरगावसाठी आहे. कोपरगावला कोपटाऊन बनवायचं आहे. परदेशी गावांत धूळ नाही, मग कोपरगावात का असावी? त्यांच्या आवाजातील आत्मविश्वास पाहून सभागृहात उपस्थित असलेले काळे गटाचे कार्यकर्ते थेट उभे राहून टाळ्या वाजवताना दिसले. कोपरगावच्या राजकारणात गेल्या वीस वर्षांत असा राजकीय भूकंप झालेला नाही.

काका कोयटे यांच्या प्रवेशानं आणि आ. काळे यांच्या रणनितीनं कोपरगावातील निवडणूक आता थेट 'काळे विरुद्ध कोल्हे' अशा दोन ध्रुवांमध्ये विभागली गेली आहे. आता पाहायचं एवढंच कोणाची 'सत्ता' जनता मान्य करते आणि कोणाचे 'मनसुबे' कोसळतात!

---

## रेणुकामाता मंदिरात दिपोत्सव साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील तोंडोळी येथे पौर्णिमेनिमित्त ग्रामदैवत रेणुकामाता मंदिर संस्थानच्या वतीने दिपावलीच्या पहिल्या पौर्णिमेनिमित्त दिपोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शंकुतला गणेश सारडा, प्रियंका लोहिया, कांचनमाला लोहिया, उर्मिला लोहिया, तुलसाबाई लोहिया, दिपाली सारडा, प्रेमलता लोहिया, मिना लोहिया, अर्चनाताई लोहिया, अरुणा देशमुख, संगिता राजेंद्र वारंगुळे, सुष्मा वारंगुळे, अनिता झिरपे, सरपंच रेणुका वारंगुळे, सोनाली काकडे, आशा देवढे, माजी सरपंच मंगलआवारे, रेणुका शिंदे, मिरा शिंदे यांच्यासह तोंडोळी येथील सर्व महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग होता.

कार्यक्रमावेळी रेणुकामाता मंदिर संस्थानचे अध्यक्ष गणेश सारडा यांनी मागील तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी बक्षिस वितरण उपक्रमाचाही शुभारंभ केला. या प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.हा दिपोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडला असून मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला होता. महिलांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह लाभला.

---

## धर्म नव्हे माणुसकी बघा : सुप्रिया राज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : आपल्या कर्तव्याप्रती प्रामाणिक राहा, धर्म नव्हे माणुसकी बघा असा प्रभावी संदेश देत सुप्रिया राज यांनी काश्मीरीयतच्या अनुभवांनी सभागृहातील प्रत्येकाच्या मनात ऊर्जा निर्माण केली. थरारक अनुभव ऐकताना श्रोते अक्षरशः तल्लीन झाले होते. अनुभवातून शिकण्याच्या शोधात त्यांनी काश्मीरच्या कानाकोपऱ्यांपर्यंत प्रवास केला. त्या सांगतात काश्मीरचे चित्तथरारक सौंदर्य नव्हे, तर त्यातील मानवतेचा संघर्ष मला भावला. या प्रवासात त्यांना भेटलेलं गाव, माणसं, अनुभव सारं काही एक दर्दपूराच.

जिथे केवळ विधवा स्त्रिया राहतात, आंतकवादात पती गमावलेले. त्या स्त्रियांच्या डोळ्यातील अश्रूमध्ये दुःख असले तरी त्यांचं जगणं म्हणजे धैर्याची जिवंत कहाणी असे अनेक चित्तथरारक पण प्रेरणादायी अनुभव काश्मिरीयत एक जिवंत अनुभव या विषयावर कवी अनंत फंदी व्याख्यानमालेचे




पाचवे पुष्प गुंफताना सामाजिक कार्यकर्त्या लेखिका सुप्रिया राज यांनी श्रोत्यांशी संवाद साधला. अध्यक्षस्थानी संकेत कलंत्री होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र भंडारी, सचिव अरुण ताजणे, प्रकल्प प्रमुख सुनील चांडक, सदस्य पापय्या सिरसुल्ला यांसह श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माझा संपूर्ण प्रवास हा अनवाणी पायाचा आहे. यात कुठेही अध्यात्म अथवा धर्म नाही तो माझा एक चाळा असल्याचेही त्या सांगत होत्या. आपले अनुभव सांगताना सुप्रिया राज म्हणाल्या, त्या गावातील बानू बेगम या विधवेची शब्दांत न मावणारी कहाणी त्यांनी मांडली.

बानू बेगमसारख्या स्त्रिया आजही संघर्षात जगत आहेत, पण त्या हार मानत नाहीत.

### टिटवाळा गावात माणुसकी जीवंत

सीमेवरील टिटवाळा गावातील अनुभव त्यांनी सांगताना म्हटले तेथे परवानगीशिवाय प्रवेशच नाही. घरे, थंडी, वीज नसलेली रात्री पण माणसांच्या चेहऱ्यावर माणुसकी होती. राष्ट्रगीतापूर्वी नाश्ता न करणाऱ्या लोकांचा तो संस्कार मनात कोरला गेला अन् मी जागी झाली आपल्या विश्वातून. सैनिकी तपासणी, बंद पडलेली मंदिरे, धार्मिक तणाव या सगळ्यातूनही त्यांनी मानवता जिवंत ठेवली. धर्म बघून ठरवू नका, मन स्वच्छ ठेवा अनुभवही स्वच्छ येतील, असं त्यांनी सांगितले.

---

## सोयाबिनला मिळणार आता हमीभाव

### ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगांव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्राला एन.सी.सी. एफ व पणन विभागाकडून मंजुरी मिळाली आहे. सोयाबीन पिकाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी सुरू झाली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाला योग्य किंमत मिळण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन सभापती साहेबराव किसनराव ,रोहोम व उपसभापती गोवर्धन बाबासाहेब पा. परजणे यांनी केले आहे. सभापती रोहोम म्हणाले की, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी सरकारने दिलासादायक निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणीच्या परिस्थितीत दिलासा मिळणार आहे.

शासनाचा पणन विभाग व अंतर्गत आधारभूत किंमत खरेदी योजना २०२५-२६ सुरू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत कोपरगांव तालुक्यातील शेतकऱ्यांचा सोयाबीन शेतमाल हमीभावाने खरेदी केला जाणार आहे. कोपरगांव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वतीने ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. शेतकऱ्यांनी पुढील आवश्यक कागदपत्रासह आपली नोंदणी पूर्ण करावी. या खरेदी केंद्रात सोयाबीन ला ५ हजार ३२८ रूपये प्रति क्विंटल असा हमीभाव मिळणार आहे. नाव नोंदणीसाठी ७/१२. ८अ उतारा (ई-पिक पाहणी २५-२६), आधारकार्ड झेरॉक्स, आधार लिंक बँक खाते (सुस्पष्ट झेरॉक्स) व मोबाईल नंबर आवश्यक आहे. जनधन खाते स्विकारले जाणार नाही. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोयाबीन खरेदीसाठी आणण्यासाठी वेळ व तारीख एस.एम.एस व्दारे कळविण्यात येईल.

---

## वारीतील शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वारी** : कोपरगाव तालुक्यातील वारी आणि सडे येथील शेतकऱ्यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसान भरपाईची रक्कम उर्वरित शेतकऱ्यांच्य खात्यामध्ये लवकरात लवकर जमा करावी, अशा आशयाचे निवेदन नायब तहसीलदार सातपुते यांच्याकडे दिले. सप्टेंबर २०२५ मध्ये राज्य शासनाने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानासाठी भरपाई जाहीर केली होती. त्यानुसार गावातील ग्रामविकास अधिकारी, कृषी सहाय्यक आणि तलाठी यांच्या माध्यमातून तालुक्यातील सर्वत्र नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करण्यात आले होते. त्यानुसार बऱ्याच शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये नुकसान भरपाईची रक्कम जमा करण्यात आली, परंतु तालुक्यातील काही शेतकऱ्यांच्या खात्यावर सदर रक्कम जमा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

### उर्वरीत रक्कम खात्यावर जमा होणार

निवेदन स्वीकारताना तहसीलदारांनी उर्वरित रक्कम लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे आश्वासन दिले. यावेळी सत्यम टेके, मधुकर टेके, सडे गावचे सरपंच सतीश बाराहाते, गणेश बारहाते, दत्तात्रय शिरसाठ, भाऊसाहेब गोरडे, नितीन टेके सहित वारी व सडे गावचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

---

## शेवगावच्या सायकल वीरांचा सन्मान

### दीड हजार किलो मीटरचा टप्पा केला सर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : शेवगाव सायकल असोसिएशनच्या सोमनाथ नारळकर (नगर पालिका प्रशासकीय अधिकारी) व संभाजी कोठूळे (उद्योजक) या दोन रायडर्सनी कमी कालावधीत एसआर ही चार टप्प्यातील १ हजार ५०० किलो मीटरची स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला. सायकल असोसिएशनच्या अनेक सायकलपटूंनी राज्यातील व राज्याबाहेरील विविध क्लबच्या व्हर्चुअल चॅलेंजमध्ये सहभाग नोंदून यशस्वीरीत्या पुर्ण करून शेवगाव क्लबचे नाव वलयांकित केले.

यामध्ये वसंत सुरवसे या ६३ वर्षीय रायडरने तब्बल २० चॅलेंजमध्ये सहभाग नोंदवून मेडल मिळविले. दुसरे रायडर सचिन बांडेकर यांनी १४ चॅलेंजमध्ये सहभागच नोंदविला नाहीतर तीन चॅलेंजमध्ये प्रथम क्रमांक, दोन चॅलेंजमध्ये अनुक्रमे २ रा व ३ रा क्रमांक मिळविला. त्यांच्या खालोखाल निलकंठ लबडे, सुनिल गवळी, प्रदिप बोडखे, विनोद ठाणगे (अध्यक्ष), डॉ. संदिप बोडखे (समन्वयक), शंकर गरड, डॉ. प्रदिप उगले, डॉ. स्मिता उगले, डॉ मनिषा लड्डा, डॉ. वैद्य, भागनाथ काटे यांनी ही सहभाग नोंदून मेडल प्राप्त केले. या सर्व सायकल वीरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. हा सन्मान प्रा. लक्ष्मण बिटाळ यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख पाहुणे श्रीरामपुर सायकल क्लबचे मार्गदर्शक डॉ. संकेत मुंदडा, डॉ. केतन बधे, उपजिल्हा अधिकारी तथा शेवगाव सायकल क्लबचे आधारस्तंभसंतोष काकडे यांच्या उपस्थितीत पार पडला.

प्रास्ताविक अध्यक्ष विनोद ठाणगे यांनी तर सुत्रसंचालन कैलास जाधव यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संजय लड्डा, डॉ. योगेश फुंदे, डॉ. प्रा गजानन लोंढे, निलेश केवळ यांनी परिश्रम घेतले.

---

## बिबट्यांचा होणार आता बंदोबस्त

### जिल्हा नियोजनातून ८ कोटी १३ लाखांचा निधी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्यांचे प्रमाण लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी जिल्हा नियोजन व विकास समितीतून ८ कोटी १३ लाख ४४ हजार रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

बिबट्यांच्या वाढत्या हालचालींचा विचार करून पालकमंत्र्यांनी मागील दोन दिवसांपासून जिल्हाधिकारी व वन विभागाशी सतत संपर्क ठेवत परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी चर्चा करून जिल्ह्यास आवश्यक अतिरिक्त यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याबाबत सूचित केले. जिल्ह्यात ११५० बिबटे असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांना पकडण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यास सांगितले असून पकडलेले बिबटे वनतारा येथे स्थलांतरित करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय घेण्यात आला आहे.

या कार्यवाहीची अंमलबजावणी त्वरित करण्याचे निर्देशही देण्यात आले. तालुकानिहाय परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशा जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, असेही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

### या साहित्यांची होणार खरेदी

उपलब्ध निधीतून ३०० पिंजरे, ३०० ट्रॅप कॅमेरे, तसेच जॅकेट, शूज, टॉर्च गन्स आणि संरक्षणात्मक किट यांसारखी रेस्क्यू उपकरणे खरेदी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय २२ रेस्क्यू वाहने तातडीने खरेदी करण्यासही प्रशासनास सांगण्यात आले आहे.

---

## पिचडांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात अकोलेचे माजी आमदार वैभव पिचड यांनी भेट घेऊन विविध विकासात्मक विषयांवर चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनीही सर्व मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत योग्य ती मदत आणि निधी उपलब्ध करून दिला जाईल, असा विश्वास दिला. हा अकोले तालुका प्रामुख्याने आदिवासी, डोंगराळ व दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो.

या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारने सातत्याने प्रयत्न करावेत, अशी विनंती माजी आमदार पिचड यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली. आदिवासी विकास महामंडळाचा निधी, आदिवासी अर्थसंकल्प, पर्यावरण संवर्धन, पर्यटनवाढ, रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणा अशा अनेक विषयांवर सविस्तर चर्चा झाली. हरिश्चंद्रगड, राजूर, बारी आणि भंडारदरा परिसरात मोठ्या प्रमाणावर देश-विदेशातून पर्यटक येतात. याठिकाणी इको टूरिझम, ग्रामीण पर्यटन आणि सांस्कृतिक पर्यटन विकसित करण्यासाठी राज्य सरकारकडून विशेष योजना राबविण्याची गरज व्यक्त केली.

---

## पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

### श्रीरामपूर पोलिसांची शनिशिंगणापुरात कारवाई




**जनता आवाज वृत्तसेवा**

**शनिशिंगणापूर** : शनिशिंगणापूर परिसरात विविध गुन्ह्यांमध्ये अनेक महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला अखेर अटक करण्यात आली. मात्र, ही कारवाई स्थानिक पोलिसांनी नव्हे, तर श्रीरामपूर येथील अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या पथकाने केली आहे. या घटनेने स्थानिक पोलिस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांकडून तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वी शनिशिंगणापूर पोलिस ठाण्याच्या समोर दोन गटांत झालेल्या मारामारीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या प्रकरणातील काही आरोपींना अटक झाली होती, तर काही फरार होते. त्यापैकी एक आरोपी अजय बापूसाहेब ऊर्फ हौशाबापू कुऱ्हाट (वय २१, रा. शनिशिंगणापूर) यास श्रीरामपूर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे गावातच पकडले. अजय कुऱ्हाट हा अनेक महिन्यांपासून पोलिसांच्या शोधात असूनही गावात मुक्तपणे फिरत होता, अशी माहिती समोर आली आहे. त्याला

ग्रामस्थांनी स्थानिक पोलिसांवर आरोप केला आहे की, शनिशिंगणापूर पोलीस स्टेशन हद्दीत विविध अवैध धंदे, बिंगो-मटका जुगार तसेच लटकूंमार्फत भाविकांची लूट राजरोसपणे सुरू आहे. याबाबत शनिशिंगणापूर ग्रामपंचायतीने लटकू बंद करण्याचा ठराव मंजूर करूनही त्यावर काहीच कार्यवाही होत नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

---

## 'उबाठा'ची अस्तित्वाच्या उभारीसाठी लढत

### ठाकरेंनी दिले तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारेंना पूर्ण अधिकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला पारनेर तालुक्यात होवू घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूकीत अस्तित्व व उभारीसाठी मोठी कसरत करावी लागणार असून पक्ष प्रमुख ठाकरेंनी तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांना स्पष्ट कानमंत्र व पुर्ण अधिकार देऊन संपूर्ण तालुक्याची जबाबदारी देत शक्य असेल, तर महाविकास आघाडी बरोबर युती करा, अन्यथा स्वबळावर लढण्याचा स्पष्ट आदेश तर दिला.

डॉ. श्रीकांत पठारे, युवा सेनेचे तालुका प्रमुख अनिलराव शेटे, सुभाषराव भोसले, पिराजी पवार, शिवाजी लाळगे, संतोष सरोदे व इतर प्रमुख पदाधिकारी दोनच दिवसांपूर्वी राज्यातील शिवसैनिकांचे आश्रयस्थान असलेल्या मातोश्री वर पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या भेटीला दाखल झाले होते, त्यात कालची, आताची व उद्याची शिवसेना याबद्दल उहापोह करण्यात आला. प्रत्येक पदाधिकाऱ्याचा कानोसा घेत, समर्पक चर्चा करत, नव्या - जुन्या शिवसैनिकांना बरोबर घेत ठाकरे यांनी तालुक्यात राजकीय



दरम्यान, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांच्या भेटी गाठी घेऊन त्यांना प्रेरीत करण्यासाठी राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना सुपा येथे पाठवत शिवसैनिकांमध्ये स्फुलिंग पेटवले आहे . आगामी काळात येणारे प्रश्न, अडी अडचणी यावर चर्चा करत, प्रसंगी मदत करण्याचाही ना. दानवे यांनी शब्द दिल्याने शिवसैनिकांना हजारो हत्तींचे बळ मिळाले आहे.

ताकद आजमावण्याचा, नव्हे ताकद दाखवून देण्याचा, तशी तयारी करण्याचा ही आदेश ही दिला. या आदेशाने शिवसैनिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

शिवसेनेचे सध्या तालुक्यात २ गट कार्यरत असून तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे व जिल्हा उपप्रमुख डॉ. भास्करराव शिराळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना विभागली गेली आहे. तसे पाहाता डॉ. पठारे हे स्वतंत्र बाण्याने काम करत आहेत तर पुर्वाश्रमीचे काँग्रेसवासीय व विखे पाटील यांचे पुर्वीचे खंदे समर्थक राहिलेले डॉ. शिरोळे यांची लोकसभा व विधानसभा निवडणुकीपासून खा. निलेश लंके यांच्या विचारांशी नाळ जोडली गेली आहे. त्यामुळे खा. लंके यांची संपूर्ण राजकीय रसद होऊ घातलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत डॉ. शिरोळे यांच्या पाठीशी उभी राहणार आहे, तसे जाहीर संकेतच खा. लंके यांनी दिले आहे.

पण डॉ. श्रीकांत पठारे यांचे अन् खा. लंके यांचे कधीच सुते- पाते जमले नाही. तसे जाहीर आव्हाने ही देण्यात आली आहेत, अन् येथेच माशी शिंकली. शिवसेनेचे तालुक्यात कागदवरती तरी दोन गट स्पष्ट पणे दिसत आहेत, शिवसेना, राष्ट्रवादी एकत्र आले नाही, तर महाविकास आघाडी ची ताकद विभागली जाईन व त्याचा फायदा आपसूकच महायुतीला होईल. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकी संदर्भात तालुका प्रमुख डॉ . पठारे यांनी सुपा येथे पदाधिकारी व निवडक प्रमुख शिवसैनिकांच्या बैठकांचा सपाटा लावला असून लवकरच शिवसेनेचा मेळावा घेणार आहे . निवडणूकी साठी इच्छुकांच्या मुलाखती नजीकच्या काळात घेणार असल्याचेही कळतेय. एकंदरीत ठाकरेंच्या या आदेशामुळे पारनेर तालुक्यातील शिवसेना व शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य पसरले असून इतर राजकीय पक्षांनी त्याची दखल घ्यायला सुरुवात केली आहे.

# पंडित नेहरुंनी आधुनिक भारताच्या विकासाचा पाया घातला

## डॉ. सुधीर तांबे; यशोधन कार्यालयात पंडित नेहरू व वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** भारतीय स्वातंत्र्य लढ्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सक्रिय सहभाग घेणारे स्वातंत्र्यसेनानी व भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू हे आधुनिक विचारांचे पाईक होते. पंडित नेहरू यांच्या वैज्ञानिक दूरदृष्टीमुळे आधुनिक भारताच्या विकासाचा पाया घातला असल्याचे प्रतिपादन जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे.

> भारतीय स्वातंत्र्य लढ्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाष चंद्र बोस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लहुजी साळवे यांच्यासह अनेक राष्ट्रपुरुषांनी योगदान दिले. याचबरोबर भारताच्या समर्थ लोकशाहीचा पाया घातला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हरितक्रांती आधुनिक विज्ञान क्रांतीचा पाया घातला. धरणे ही तीर्थस्थळे मानून जलसिंचनाच्या योजना राबवल्या. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला सन्मान मिळवून दिला. सर्व धर्म समभाव व विकासाची परंपरा त्यांनी जोपासली.
>
> **– डॉ. सुधीर तांबे, माजी आमदार**

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथे पंडित जवाहरलाल नेहरू व वस्ताद लहुजी साळवे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी ज्ञानेश्वर राक्षे, राजेंद्र आव्हाड, किशोर साळवे, गणेश बलसाने, विकी पवार, दत्ता लाहुंडे, आर. के. जाधव, सचिन वाघमारे, संदीप आव्हाड, बाबासाहेब साळवे, संजय जमदाडे, राजेंद्र राक्षे, यशोधन कार्यालयाचे मुख्याधिकारी डॉ. नितीन भांड, रामदास तांबडे आदींसह विविध कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, अहलाबाद येथील आनंदभवन ते पंतप्रधान हा त्यांचा जीवन प्रवास तरुण पिढीसाठी कायम प्रेरणादायी असून अहिल्यानगरच्या



भुईकोट किल्ल्यात त्यांनी लिहिलेल्या डिस्कवरी ऑफ इंडिया हा समृद्ध भारताच्या इतिहासाची साक्ष देणारा मोठा ठेवा त्यांनी लिहिला आहे.

विज्ञानवादी पंडित नेहरू यांनी इस्रोची स्थापना केली. आयआयटी, अनुशक्ती केंद्र, पंचायत राज सह जगाला पंचशील तत्वांचा शांतीचा मंत्र दिला. मात्र आज जे काहीही करू शकले नाही असे लोक टीका करत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

वस्ताद लहुजी साळवे सशस्त्र क्रांतीचे जनक होते. जगेन तर देशासाठी आणि मरेन तर देशासाठी हे ब्रीद घेऊन त्यांनी तरुणांची मोठी फौज ब्रिटिशांविरुद्ध लढण्यासाठी उभे केली होती. या सर्व देशभक्तांच्या जीवनकार्यातून युवकांनी आदर्श घेऊन समाजासाठी योगदान द्यावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संगमनेर शहरातील कार्यकर्ते युवक अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दैत्य नांदूर येथे आ. मुंडेंच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक

## आ. मुंडेंच्या समर्थनार्थ ओबीसी समाजाचा जरांगेवर हल्लाबोल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील दैत्य नांदूर येथे ओबीसी समाजाने माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या समर्थनार्थ जोरदार निदर्शने करत मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे यांच्याविरोधात हल्लाबोल केला. गुरुवारी सकाळी दैत्य नांदूर गावातील स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्यासमोर धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालून त्यांना पाठिंबा दर्शवण्यात आला. ओबीसी समाजातील कार्यकर्त्यांनी धनंजय मुंडे आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं अशा घोषणा देत जरांगे यांच्या वक्तव्याचा निषेध नोंदवला.

> मनोज जरांगे यांनी ओबीसी समाजाविरोधात द्वेष पसरवून धनंजय मुंडे यांचे राजकीय आणि सामाजिक जीवन उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. ते मराठा समाजाच्या आरक्षण लढ्याचा गैरफायदा घेऊन स्वतःचे आणि त्यांच्या माफियांच्या हिताचे राजकारण करत आहेत. जरांगे यांच्या खुनाच्या कटाची स्क्रिप्ट ही केवळ लोकांना दिशाभूल करणारी आहे.
>
> **– राजेंद्र दौंड**

आजिनाथ नवनाथ दहिफळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निषेध आंदोलनात राजेंद्र दौंड, पप्पू केदार, सुरेश



आव्हाड, राजेंद्र दहिफळे, अशोक दहिफळे, बाबासाहेब वाघ, दहिफळे, कानिफ वाघ, अर्जुन वाघ, अंकुश दौंड, शिवाजी दहिफळे, सुधीर दहिफळे, रशीद बागवान, शेषराव वाघ, महेश दहिफळे, हरी दहिफळे, सतीश गाडे, संजय गाडे, मदन दहिफळे, पांडुरंग दहिफळे आदींसह मोठ्या संख्येने ओबीसी समाजबांधव उपस्थित होते. ओबीसी समाजाच्या या भूमिकेमुळे तालुक्यात जरांगे यांच्या विरोधात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नेवाशात बोगस खरेदीखत घोटाळा?

## चक्क मृत व्यक्तीला साक्षीदार दाखवून मालमत्ता हडपली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** तालुक्यात एका अत्यंत धक्कादायक फसवणूक प्रकरणात थेट दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नोंदींचा गैरवापर झाल्याचे उघड झाले आहे. मौजे जेऊर हैबती (ता. नेवासा) येथील मंडप व्यावसायिकांनी तब्बल चार वर्षांपूर्वी एका मालमत्तेवर बनावट कागदपत्रे, खोट्या सह्या आणि विशेष म्हणजे मृत व्यक्तीला साक्षीदार दाखवून खरेदीखत नोंदवल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

फिर्यादीला न्याय मिळत नसल्याने त्यांनी थेट न्यायालयाचा दरवाजा ठोठावला असता, न्यायालयाने आता या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चारही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहे. जेऊर हैबती येथील मिळकत क्र. ६४/४ (क्षेत्र ७६३ चौ.फुट) ही मालमत्ता फिर्यादी दत्तात्रय यादव शिंदे यांच्या मालकीची होती. ही मालमत्ता त्यांच्याच नावावर असताना




आरोपी सुभाष मच्छिंद्र औटी, भागवत बबन गायके, राम बंडू शिंदे आणि मंगेश उर्फ बंडू गोरख मुटकुळे यांनी संगनमत केले.

या आरोपींनी मिळून दस्त क्रमांक ४७६३/२०२० हे बनावट खरेदीखत २ डिसेंबर २०२० रोजी नोंदवले. आरोपींनी फिर्यादीचे बनावट आधारकार्ड तयार केले आणि त्यावर आरोपी क्रमांक ४ चा फोटो वापरला. फिर्यादीच्या नावाने खोटी सही करून दस्त नोंदवला गेला. या व्यवहारात साक्षिदार म्हणून दाखवलेला बंडू यादव शिंदे हा व्यक्ती ९ एप्रिल २०१८ रोजीच मयत झाला होता. मृत व्यक्तीला साक्षीदार दाखवणे, हे गंभीर संगनमताचे उदाहरण असल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे.

> सदरील घटना केवळ बनावट कागदपत्रांची नव्हे, तर शासनाच्या नोंदींमध्ये फेरफार करून मालमत्ता बळकावण्याचा गंभीर प्रयत्न आहे. न्यायालयाचा आदेश म्हणजे अशा फसवणुकीविरोधात मिळालेला कायदेशीर दिलासा आहे.
>
> **– ॲड. संजय लवांडे**

# नगरपालिका न लढविण्याचा शेख यांचा निर्णय

## अंजुम शेख यांच्या निर्णयाला नागरिकांचा कडाडून विरोध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** काल सायंकाळी झालेल्या वेगवान घडामोडींमध्ये माजी उपनगराध्यक्ष अंजुम शेख व त्यांच्या पत्नी समीना शेख यांनी आगामी नगरपालिकेची नगरसेवक पदाची निवडणूक आपण लढविणार नसल्याचे जाहीर करून मोठा बॉम्ब टाकला. त्यांच्या या निर्णयाला कडाडून विरोध करत उपस्थित शेकडो हिंदू-मुस्लीम व वैदू समाजाच्या सर्वधर्मीय मतदारांनी ठिय्या धरून या निर्णयाचा फेरविचार करा, तुम्ही भागात येऊ सुद्धा नका, फक्त अर्ज भरा, असा आग्रह त्यांना केला.

काल सायंकाळी पाच वाजता अंजूम शेख यांनी प्रभाग क्रमांक सहा सात आठ मधील आपले परंपरागत मतदार कार्यकर्ते स्नेही यांची एक सहविचार सभा आपल्या निवासस्थानी आयोजित केली

> माझे वडील जलीलखान पठाण व माझे पती यांनी या भागाची खूप सेवा केली आहे. आपण सर्वांनी सुद्धा आमच्या कुटुंबावर खूप प्रेम केले आहे. परंतु आमच्यावर होणाऱ्या आरोपामुळे आम्ही नगरपालिका निवडणूक लढविण्यापासून अलिप्त राहत आहोत.
>
> **– समीना शेख, माजी नगरसेविका**



होती. या सभेला या भागातील हजारापेक्षा जास्त लोक उपस्थित होते.

प्रास्ताविक भाषणामध्ये रज्जाक पठाण यांनी आजची सभा बोलवण्याचा मागचा विषय विशद केला. त्यानंतर अंजूम शेख म्हणाले कि, गेली वीस वर्ष नगरसेवक म्हणून काम करताना वार्ड नंबर दोन मधील प्रत्येक नागरिकांच्या सुखदुःखामध्ये मी व माझे कुटुंब आम्ही समरस झालो. प्रभागातील जेवढी विकास कामे करता येतील तेवढी प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला. परंतु परवाच्या प्रकरणामुळे मला मानसिक धक्का बसला आहे. एवढं सर्व करायचं कुणासाठी आणि राजकारणामध्ये जर कोणी अशा पद्धतीने माझ्या अब्रूवर घाला घालणार असेल तर त्यापासून दूर राहिलेले बरे. त्यामुळे यंदाची नगरपालिका निवडणूक न लढविण्याचा निर्णय आम्ही उभयतांनी घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

# दहिगाव-ने येथे कृषि विस्तार अधिकारी प्रशिक्षण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा :** शेतीमधील विविध तंत्रज्ञान प्रचार आणि प्रसारमध्ये कृषि विस्तार अधिकारी यांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. त्यासाठी त्यांना शेतीमधील नव नवीन तंत्रज्ञान विषयीचे प्रशिक्षण देणे हा एक कृषि विज्ञान केंद्राचा उद्देश आहे. याचाच एक भाग म्हणून कृषि विस्तार अधिकारी यांच्यासाठी रब्बी हंगामातील महत्वाची पिके जसे गहू, हरभरा आणि ऊस पिक एकात्मिक उत्पादन तंत्रज्ञान या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षात कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. श्यामसुंदर कौशिक यांनी गहू पिकातील आधुनिक तंत्रज्ञान जसे वेळेवर पेरणी, योग्य गहू वाणांचा




वापर, अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि तण नियंत्रण या विषयी मार्गदर्शन केले.

माणिक विषय विशेषज्ञ यांनी गहू, हरभरा आणि ऊस पिकातील किड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. इंजि. राहुल पाटील, विषय विशेषज्ञ (कृषि अभियांत्रिकी) यांनी रब्बी हंगामातील पिकांमध्ये विविध औजारे जसे ऊस लागवड यंत्र, मका टोकन यंत्र, बिज प्रक्रिया यंत्र, रुंद सरी वरंबा पेरणी यंत्र आदी औजारांचा वापर या विषयी मार्गदर्शन केले. नारायण निबे, विषय विशेषज्ञ (कृषि विद्या) यांनी हरभरा आणि ऊस पिक एकात्मिक उत्पादन तंत्रज्ञान या विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना सचिन बडधे यांनी केली. तर आभार प्रकाश बहिरट यांनी मानले. कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# ‘डॉ. काटेस्वामीजी’ला कार्यक्षम पतसंस्था पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहरातील गुरुदेव डॉ. काटेस्वामीजी नागरी सहकारी पतसंस्थेला तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन आयोजित स्पर्धेत चेअरमन अनिरुद्ध महाले यांच्या नेतृत्वखाली सलग दहाव्या वर्षी कार्यक्षम पतसंस्था पुरस्कार प्राप्त झाला.

राज्य पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शानदार समारंभात हा पुरस्कार संस्थेला प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठवर राज्य फेडरेशन संचालक व तालुका फेडरेशन अध्यक्ष वासुदेवजी काळे, विवेक सिनारे, वेंकटेश कुलकर्णी, भाऊसाहेब मुळे, रविंद्र खटोड, साहेबराव वाबळे, संजय गोरे, अश्विनी गोरे उपस्थित होते.

सल्लागार डी. बी. मोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली



संस्थेने हे यश प्राप्त केले. याप्रसंगी चेअरमन अनिरुद्ध महाले, व्हॉईस चेअरमन दादासाहेब राऊत,लोन कमिटी चेअरमन कल्पेश चोथानी, डॉ. प्रशांत लखोटिया, बी. एन. पवार, बापुसाहेब गायकवाड, संदीप पटारे, संपत पोकळे, शोभा कसार, नंदकुमार धनवटे व्यवस्थापिका गिरीजा टंकसाळे, शाखा व्यवस्थापक दीपक दवंगे, भाऊसाहेब लगे, निर्मला येवले, अभिषेक कुसळकर, नाना काळे, सुनील राजुळे उपस्थित होते. पुरस्काराबद्दल संस्थेचे राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, व्ही. एन. ताके यांनी अभिनंदन केले आहे.

# तुषार जाधवांना प्रयोगशील कृषी विस्तार कार्य सन्मान पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाशिक :** आधुनिक शेतीत युवकांचा सहभाग वाढावा आणि प्रयोगशील कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा या उद्देशाने कृषीथॉन २०२५ या आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शनात आज प्रयोगशील कृषी विस्तार कार्य सन्मान पुरस्कार तुषार विलास जाधव यांना प्रदान करण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील कोल्हार बु येथील तुषार विलास जाधव यांना कृषी विस्तार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी हा मानाचा पुरस्कार मिळाला. तुषार जाधव हे कृषक गटाचे सक्रिय सदस्य तसेच गटाचे शेती सल्लागार असून शेतकऱ्यांना आधुनिक, वैज्ञानिक आणि प्रयोगशील तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन करण्याचे त्यांनी सातत्याने कार्य केले आहे.

त्यांच्या मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमता, पीक व्यवस्थापन, स्मार्ट शेती तंत्रज्ञानाचा वापर आणि आधुनिक बाजारपेठेतील सहभागात लक्षणीय वाढ झाली आहे. या नाविन्यपूर्ण व प्रभावी कार्याची दखल घेऊन




कृषीथॉनच्या निवड समितीने त्यांची निवड केली.

आज नाशिकच्या येथे झालेल्या कृषीथॉन समारंभात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार तुषार जाधव यांना प्रदान करण्यात आला. कृषी क्षेत्रातील तज्ञांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत हा सन्मान त्यांच्या प्रयोगशील आणि प्रभावी कृषी विस्तार कार्याची पावती असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी विखे पाटील कारखान्याची संचालक ज्ञानेश्वर खर्डे, गटाचे सचिव विनोद राऊत, गटाचे सदस्य भागवत शेळके, सुभाष शेळके, संजय राऊत, दत्तात्रय शेळके, वैभव भणगे, पंचायत समिती सदस्य भरत अंत्रे तसेच गटातील सदस्य उपस्थित होते.

# थोरात कारखान्याकडून सहकार सप्ताह साजरा

## कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग घुले यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** सर्वसामान्य माणसाच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम सहकार चळवळीने केले आहे. थोर स्वातंत्र्य सेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सुरू केलेली सहकार चळवळ संगमनेर तालुक्यात फुलली आहे. या सहकारी चळवळीमुळे संगमनेर तालुका समृद्ध झाला असून ती टिकवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग घुले यांनी केले असून सहकारमहर्षी भाऊसाहेब

> महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरचा सहकार हा संपूर्ण देशासाठी मार्गदर्शक ठरला आहे. सहकार चळवळीमुळे संगमनेर तालुक्यात समृद्धी निर्माण झाली आहे. कारखाना, दूध संघ सर्व शिखर संस्था याचबरोबर गावोगावच्या सहकारी संस्थांमुळे प्रत्येक नागरिकाला मोठी मदत झाली आहे. सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या या चळवळीला जपण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.
>
> **– पांडुरंग घुले**




थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने सहकार सप्ताह साजरा होत आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीसमोर आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार सप्ताह ला सुरुवात झाली. यावेळी पांडुरंग पाटील घुले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर,सेक्रेटरी किरण कानवडे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर म्हणाले की, कारखान्याच्या वतीने होत असलेल्या सहकार सप्ताह निमित्त १४ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर २०२५ या काळामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहेत. यामध्ये कामगारांचे आरोग्य तपासणी, स्वच्छता अभियान वृक्षारोपण संवर्धन याचबरोबर ऊस उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

याप्रसंगी ध्वजारोहण करून सुरक्षा जवानांच्या वतीने मानवंदना देण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेक्रेटरी किरण कानवडे यांनी केले. कृष्णा दिघे यांनी आभार मानले.

# वडाळा महादेवच्या भाविकांसाठी अष्टविनायक यात्रा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील भाविकांसाठी अष्टविनायक यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अष्टविनायक दर्शन यात्रेमध्ये साधारण १२५ भाविक भक्त यांनी सहभाग नोंदवला भाविकांना शुभेच्छा देण्यासाठी अशोक कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे यांची उपस्थिती लाभली.

लेण्यांद्री येथील गिरजात्मक, ओझर येथील श्री विघ्नहर, महड येथील वरदविनायक, पाली येथील बल्लाळेश्वर, थेऊर चिंतामणी, मोरगाव मोरेश्वर, तसेच सिद्धटेक सिध्दिविनायक आदी गणपतीचे दर्शन घेऊन भाविकांनी समाधान व्यक्त केले. यात्रा उत्सवाचे उद्धव आहेर यांनी आयोजन केले.

यावेळी मनिषा भालेराव, माधुरी खेले, मिना गवळी, कल्पना गवळी, नंदा राऊत, सुमन राऊत, मनिषा धुमाळ, अंजली धुमाळ, योगिता धुमाळ, संगिता पाटिल, सुजाता माळी, अर्चना राजेभोसले, उर्मिला विखे, अनिता भवार, कविता राऊत, सुरेखा फोफसे, सुवर्णा पटारे, उत्तमराव डांगे, प्रदिप खेले, रावसाहेब लिप्टे, नाना राऊत, हभप भानुदास खरात, चांगदेव राऊत, पुंडलिक खैरनार, भाऊसाहेब भवार, राजेंद्र सोनवने, गोरक्षनाथ भालेराव, चालक ज्ञानेश्वर पवार, यांनी विशेष परिश्रम घेतले. यात्रा आयोजक उध्दव आहेर यांनी सर्व भाविकांचे आभार मानले.

# अस्मिता

## पौष्टिक पालक ढोकळा

रसगंधा

**सर्वसाधारणपणे वेगवेगळ्या प्रकारचे ढोकळे बनवले जातात. तुम्ही मस्तपैकी पालक ढोकळा रेसिपी ट्राय करू शकता.**

**साहित्य :** एक वाटी रवा, अर्धी वाटी दही, अर्धी वाटी पालक पेस्ट, एक पाऊच इनो, मीठ

तडक्यासाठी : एक चमचा तूप, थोडे तीळ, दोन हिरव्या मिरच्या आणि कढीपत्त्याची पानं

**कृती :** एका भांड्यात रवा, दही, पालक पेस्ट आणि मीठ घालून नीट मिसळून घ्या. त्यात थोडं पाणी घाला. आता हे मिश्रण गोलाकार भांड्यात घाला. कुकर किंवा इडली पात्रात वाफवून घ्या. १५ मिनिटांनी उघडून बघा. सुरीने तपासून बघा. कच्चा वाटला तर अजून काही काळ वाफवून बघा. ढोकळा थंड होऊ द्या. त्यानंतर कापून घ्या. आता तडक्यासाठी एक भांडं घ्या. त्यात मोहरी, तीळ घाला. मग कढीपत्त्याची पानं आणि मिरच्या घाला. हा तडका ढोकळ्यावर घाला. पौष्टिक पालक ढोकळा तयार आहे.



हेअर केअर

### केसांच्या प्रकारानुसार करा कंडिशनिंग

शँपू लावल्यानंतर केसांना कंडिशनर लावावा लागतो. मात्र केसांच्या प्रकारानुसार कंडिशनर लावायला हवा. तुमचे केस जाड असतील तर कंडिशनरचा नियमित वापर करायला हवा. पातळ केस विंचरताना अडकून तुटतात. त्यामुळे असे केस वारंवार विंचरत बसण्यापेक्षा कंडिशनरचा वापर करा. कोरड्या केसांसाठी मॉईश्चरायझिंग कंडिशनरची गरज भासते. केसांमधला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी दर दोन दिवसांनी कंडिशनरचा वापर करता येईल. रंग लावलेल्या केसांची अधिक काळजी घ्यावी लागते. त्यामुळे नियमित कंडिशनिंग करण्यासोबतच आठवड्यातून दोन वेळा डीप कंडिशनिंग करा.



मेक अप

### असा मिळवा मॅट लूक

बाजारात मॅट आणि ग्लॉसी अशा दोन प्रकारच्या लिपस्टिक्स मिळतात. तुमच्याकडे ग्लॉसी लिपस्टिक असेल आणि तुम्हाला मॅट लूक हवा असेल तर तो तुम्ही मिळवू शकता. ओठांची नीट काळजी घ्या. ओठांवर नियमितपणे लिपबाम लावा. मॅट लूक मिळवण्यासाठी सर्वात प्रथम ओठांवर लिप बाम लावा. मग त्यावर फाउंडेशन लावा. यानंतर लिप लायनरच्या मदतीने आउटलाईन काढून घ्या. आता लिपस्टिक लावा. यानंतर टिश्यू पेपरने ग्लॉसी लिपस्टिकमधला ओलावा शोषून घ्या. यानंतर ओठांवर थोडी पावडर लावा. यामुळे तुम्हाला मॅट लूक मिळू शकेल.



ब्युटी टिप्स

### स्वच्छता खोट्या पापण्यांची


सध्या खोट्या पापण्यांचा वापर बराच वाढला आहे. खोट्या पापण्या लावण्यासाठी गमचा वापर होतो. मग मस्कारा लावला जातो. या गमवर धूळ तसंच इतर प्रदूषित कण चिकटून बसतात. यामुळे खोट्या पापण्यावर बॅक्टेरियांची वाढ होऊ लागते. हे टाळण्यासाठी या पापण्यांची वेळोवेळी स्वच्छता करायला हवी. या पापण्यांवरचा गम ट्विजरच्या मदतीने काढून टाका. मग काढून टाकल्यावर मिसेलर वॉटर घ्या. या पाण्यात पापण्या १५ मिनिटांसाठी भिजवून ठेवा. यामुळे पापण्यांवरचा गम आणि इतर घाण मऊ पडेल आणि सहजपणे काढता येईल. आता कापसाचा बोळा घेऊ ही घाण काढून टाका. यानंतर या पापण्या टिश्यू पेपरवर ठेऊन उरलेलं पाणी काढून टाका. पापण्या वाळू द्या. या कृतीनंतर तुमच्या पापण्या अगदी नव्यासारख्या दिसतील.



किचन टिप्स

### साठवण बटाट्यांची

बटाटा ही वेळेला उपयोगी पडणारी भाजी आहे. म्हणूनच घरात बरेच बटाटे आणले जातात. हे बटाटे अधिक काळ टिकवून ठेवण्याच्या काही पद्धती आहेत. बटाटे उन्हात ठेऊ नका. बटाट्यांना हवा लागायला हवी. बटाटे कधीही फ्रीजमध्ये ठेऊ नका. बऱ्याच जणी कांदेबटाटे एकत्र ठेवतात. मात्र ही पद्धत चुकीची आहे. बटाटे कांद्यांसोबत ठेवल्याने त्यांना अंकुर फुटू शकतात. तसंच बटाट्यांची चव कांद्यासारखी होऊ शकते. यामुळे कांदे खराब होण्याचा धोका वाढतो. बटाटे उष्ण जागी साठवून ठेऊ नका.



## इकोफ्रेंडली पेपरवूमन

**२०१२ मध्ये ऋतुऋचा यांनी 'पेपरडम' या ब्रँड अंतर्गत स्वतःचा व्यवसाय सुरू केला. कापड कारखान्यांमधून निघणारा कचरा, केळीच्या झाडांचे तंतू, धाग्यांचे उरलेले भाग या नैसर्गिक गोष्टींचा वापर करून त्यांनी हाताने आणि यंत्रांच्या मदतीने पुनर्वापर करता येईल असा कागद तयार करायला सुरुवात केली. साधारण पंचवीस लाख रुपयांची गुंतवणूक करून त्यांनी हा व्यवसाय सुरू केला.**

मानिनी

ऋतुऋचा जैन या गुजरातमधील सूरत शहरात राहतात. त्यांचे वडील प्रिंटिंग प्रेस चालवत. त्या लहाणपणापासूनच आई वडिलांना व्यवसायात मदत करत. घरच्या वातावरणामुळे ऋतुऋचाला पहिल्यापासूनच कागद, प्रिंटिंग आणि सर्जनशील कामांची आवड होती. त्यांनी गुजरात विद्यापीठातून बी.एस्सी. आणि एम.एस्सी. पूर्ण केले. शिक्षणानंतर त्यांना आयआयटी बॉम्बे येथे ज्युनियर रिसर्च फेलोशिपची संधी मिळाली. पण संशोधनाऐवजी त्यांनी काहीतरी वेगळे करायचे ठरवले.



२०१२ मध्ये ऋतुऋचा यांनी 'पेपरडम' या ब्रँड अंतर्गत स्वतःचा व्यवसाय सुरू केला. कापड कारखान्यांमधून निघणारा कचरा, केळीच्या झाडांचे तंतू, धाग्यांचे उरलेले भाग या नैसर्गिक गोष्टींचा वापर करून त्यांनी हाताने आणि यंत्रांच्या मदतीने पुनर्वापर करता येईल असा कागद तयार करायला सुरुवात केली. साधारण पंचवीस लाख रुपयांची गुंतवणूक करून त्यांनी हा व्यवसाय सुरू केला. यात ऋतुऋचा यांच्या स्व-बचतीचा आणि सासऱ्यांच्या पाठिंब्याचा मोठा वाटा होता.सुरुवातीच्या काळात लोकांना असा पुनर्वापर केलेला कागद खरेदी करायला फारसा रस नव्हता. कारण तो किंमतीला थोडा महाग होता. लोकांमध्ये पर्यावरणपूरक उत्पादनांविषयी जागरूकताही कमी होती. मात्र त्यांनी आपले प्रॉडक्ट्स आकर्षक डिझाइनमध्ये तयार केले. नोटबुक्स, स्केचबुक्स, गिफ्ट हॅम्पर्स, प्लॅनर्स अशा वस्तूंना लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला. हळूहळू मागणी वाढत गेली आणि या छोटा उपक्रमाचे मोठ्या उद्योगात रूपांतर झाले.

आज 'पेपरडम' या ब्रँडची ओळख केवळ पर्यावरणपूरक उत्पादन एवढीच राहिली नाही, तर त्याची किंमतही कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. ऋतुऋचा जैन यांनी शिक्षण, कौटुंबिक पाठिंबा आणि एका अभिनव कल्पनेच्या जोरावर अगदी कचऱ्यापासूनही एक मोठे आणि यशस्वी उद्योग उभा राहू शकतो हे स्वतःच्या प्रयत्नांनी सिद्ध केले आहे.

## खूप एकटं वाटतंय...

काय करू?

मी २६ वर्षांची महिला असून नुकतीच एका नामांकित कंपनीत महत्त्वाच्या पदावर रूजू झाले आहे. पण इथे मला असंख्य प्रश्न भेडसावत आहेत. वरिष्ठ माझ्या कामाचं कौतुक करतात. याच कारणामुळे ऑफिसमधल्या काही सहकाऱ्यांना माझ्याबद्दल असूया वाटू लागली आहे. याच कारणामुळे ऑफिसमध्ये मला बराच त्रास दिला जातो. आमच्या टीमला नवं प्रोजेक्ट मिळाल्यानंतर वेळखाऊ कामाची जबाबदारी मला दिली जाते आणि मी खूप हळू काम करते, असा शेरा दिला जातो. त्यांनी माझी एक वेगळीच प्रतिमा तयार केली आहे. त्यामुळे मी कामात १०० टक्के योगदान देत नाही, असं वरिष्ठांनाही वाटू लागलं आहे. ऑफिसमधल्या या राजकारणाला मी खूप वैतागले आहे. मला कंपनी सोडायची नाही. अशा परिस्थितीत मी काय करू?



– मैत्रिणी, तुला धैर्य एकवटायला हवं. त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटवण्यासाठी काय करता येईल हे बघ. तुला काम मिळाल्यावर त्याची कालमर्यादा स्पष्ट कर. म्हणजे तू हे काम किती दिवसात पूर्ण करशील हे स्पष्टपणे सांग. यामुळे ते तुला जाब विचारू शकणार नाहीत. दुसरा पर्याय म्हणजे सहकाऱ्यांशी चांगले संबंध प्रस्थापित कर. त्यांनी तुला त्रास दिला, हे खरं असलं तरी सहकाऱ्यांशी चांगलं वागल्यामुळे बरेच बदल घडू शकतील. त्रास खूपच वाढला तर तू कंपनीच्या एचआरशी संपर्क साधू शकतेस. वरिष्ठांना विश्वासात घेऊ शकतेस. या परिस्थितीचा तुझ्या कामावर परिणाम होऊ देऊ नकोस. तुला स्वत:ला सिद्ध करायचं आहे. हे कायम लक्षात ठेव.

## भिजवलेले आक्रोड खाल्ल्यामुळे...

डाएट अँड न्यूट्रिशन

आक्रोड खूप आरोग्यदायी असतात हे आपण जाणतो. आक्रोडमुळे मेंदूला चालना मिळते. दररोज सकाळी दोन भिजवलेले आक्रोड खाल्ल्यामुळे तुम्हाला बरेच लाभ मिळू शकतात.



- भिजवलेले आक्रोड खाल्ल्यामुळे रक्तातली साखर नियंत्रणात राहू शकते. त्यामुळे मधुमेहींनी दररोज सकाळी भिजवलेले आक्रोड खायला हवेत.
- आक्रोडमध्ये अँटीऑक्सिटंड्स असतात. हे अँटीऑक्सिडंट्स कॅन्सरपासून बचाव करतात.
- यातल्या ओमेगा ३ फॅटी ॲसिडमुळे ताण कमी व्हायला मदत होते. शिवाय नैराश्यावरही हा परिणामकारक उपाय ठरू शकतो.
- भिजवलेले आक्रोड खाल्ल्यामुळे तुमच्या चयापचय क्रियेचा वेग वाढतो. यामुळे वजन कमी व्हायला मदत होते. आक्रोडमध्ये कॅल्शियम, पोटॅशियम, झिंक, लोह असे घटक असतात. आक्रोडमध्ये काही चांगले फॅट्सही असतात.
- यातल्या मेलाटोनिन नामक घटकामुळे निद्रानाशाची समस्या दूर होऊ शकते.
- यातलं बी ७ जीवनसत्त्व आरोग्यासाठी लाभदायी ठरतं.
- भिजवलेल्या आक्रोडांमुळे केसांनाही बळकटी मिळते.

## अशी पिकवा मेथी

परसबाग

मेथी ही अत्यंत पौष्टीक आणि आरोग्यदायी पालेभाजी. यात बरेच औषधी गुणधर्म असतात. तुम्ही घरीच मेथीची लागवड करू शकता. आजकाल पालेभाज्या सांडपाण्यावर पिकवल्या जातात. त्यामुळे त्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू लागल्या आहेत. म्हणूनच तुम्हाला घरच्या मेथीची चव चाखता येईल.



- मेथीची लागवड करण्यासाठी पसरट कुंडी किंवा कंटेनर घ्या. त्यात माती घाला. कुंडी किंवा कंटेनरच्या खाली छोटी छिद्र पाडा. माती ओली करून घ्या.
- आता या मातीवर मेथीदाणे पसरा. तुम्ही घरातल्या मेथीदाण्यांचा वापर करू शकता किंवा बाजारातूनही त्यांची खरेदी करता येईल. आता या बियांवर मातीचा एक थर द्या. मेथीदाणे पाव इंचांपेक्षा जास्त आत असू नयेत.
- या टप्प्यावर कुंडीत बऱ्यापैकी पाणी घाला. साधारण दोन दिवसांनी मेथीला कोंब फुटू लागतील. मेथीला नियमित पाणी घाला. कंटेनर सूर्यप्रकाशात ठेवा. फार प्रखर सूर्यप्रकाश टाळा.
- मेथी उष्ण वातावरणात अधिक चांगल्याप्रकारे वाढते. मेथीच्या वाढीसाठी १० अंश ते ३२ अंश तापमानाची गरज असते.
- तुम्हाला मेथी दाणे हवे असतील तर उन्हाळ्याच्या सुरूवातीला किंवा वसंत ऋतूत बिया पेरा. अन्यथा मेथीची लागवड कधीही करता येईल.
- साधारण १५ दिवसांची मेथीची कापणी करता येईल. कापणी करताना मेथी मुळापासून उखडा आणि मूळं कापून टाका किंवा काही दिवस थांबून वरून पानांचा भाग कापून घ्या. देठं तशीच ठेवा. साधारण पंधरा दिवसांनी पुन्हा मेथीची वाढ होईल.

## आधुनिक मित्र – ए आय

टेक्नो टिप्स

ए आय म्हणजे आर्टिफिशियल इंटेलीजन्स. म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा मोबाईलची माणसासारखा विचार करण्याची क्षमता. अर्थात माणसानेच त्यांना ही क्षमता दिली आहे. त्यामुळे एके काळी स्वप्नातही शक्य वाटत नव्हत्या अशा अनेक गोष्टी आता प्रत्यक्षात आल्या आहेत. एकेकाळी केवळ विज्ञानकथांमध्ये दिसणारी कृत्रिम बुद्धिमत्ता आज आपल्या रोजच्या आयुष्यात आपल्याला सतत मदत करत असते. आपण वापरत असलेले गूगल मॅप हे याचे सोपे उदाहरण आहे. आपण कुठे जायचे आहे ते टाकले की गुगल मॅप रस्ता कमी गर्दीचा कोणता, किती वेळ लागेल, मध्ये अपघात किंवा ट्रॅफिक आहे का, हे सर्व काही दाखवते. अलेक्सा आठवण करून देणे, दिवे लावणे, बंद करणे यासारखी अनेक कामे करते. आता ऑटोड्राईव्ह कार्सही आल्या आहेत. ऑनलाईन शॉपिंगमध्येही आजकाल ए आय मोठी भूमिका बजावतो. आपण एखादे उत्पादन शोधले की लगेच तुम्हाला आवडणारे अनेक पर्याय दिसू लागतात. ए आयआपले शोध, खरेदीची सवय आणि आवड लक्षात ठेवते. त्यामुळे खरेदी करणे सोपे आणि जलद होते. चॅटजीपीटीसारख्या टूल्सनी तर लेखन, भाषांतर, निबंध, भाषणे, प्रेझेंटेशन तयार करणे सोपे केले आहे. मुलांसाठी अभ्यासाची तयारी, नवीन रेसिपीज या सगळ्या गोष्टीत ए आय सतत मदतीसाठी तयार असते. मात्र ए आयवर अंधविश्वास ठेवू नये. मिळालेली माहिती खरी आहे का याची छाननी करायला हवी. कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर केलातर आपले जीवनअधिक सोयीचे, कार्यक्षम आणि क्रिएटिव्ह बनते.






## फॅशन बेल्टची

स्टाईल स्टेटमेंट

महिलावर्गासाठी कपड्यांसोबतच ॲक्सेसरीजही खूप गरजेच्या असतात. ॲक्सेसरीजच्या रास्त निवडीमुळे तुमचं व्यक्तिमत्त्व उठून दिसतं. सध्या बेल्टचा ट्रेंड आहे. हे बेल्ट खूपच आकर्षक दिसतात. आता तर साड्यांवरही बेल्ट लावले जातात. बेल्टची निवड करताना कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात याविषयी...

बेल्टचे वेगवेगळे प्रकार पहायला मिळतात. त्यात फॉर्मल ड्रेस बेल्ट, सेमी फॉर्मल बेल्ट, कॅज्युअल बेल्ट यांचा समावेश होतो. फॉर्मल ड्रेस बेल्ट घेताना मटेरियलकडे विशेष लक्ष द्या. आपल्या शरीराच्या ठेवणीनुसार बेल्टची निवड करा. शरीराचा वरचा भाग अधिक जाड असेल तर एक्स्ट्रा फ्रिंजेज असणारे बेल्ट विकत घ्या. तसंच बेल्ट असणाऱ्या प्रावरणांची निवड करा.



शरीराचा खालचा भाग अधिक स्थूल असेल तर एक किंवा दोन इंच रुंदीचे मेटालिक थीन बेल्ट शोभून दिसतील. सॅटिनचा डबल नॉट बेल्टही शोभून दिसेल. बुटक्या महिलांनी नक्षीकाम केलेला किंवा जाड बेल्ट वापरू नये. प्रावरणाच्या रंगाशी मेळ खाणारा बारीक पट्टा शोभून दिसेल. फॉर्मल ट्राउझरवर मॅचिंग किंवा कॉन्ट्रास्ट रंगाचा लेदर बेल्ट घ्या. जीन्सवर मेटल बक्कलवाला कॉटनचा बेल्ट चांगला दिसेल. जंपसूटवर जाड लेदर बेल्ट किंवा सॅटिन बेल्ट शोभून दिसेल. प्रावरणांच्या रंगाला साजेसे बेल्ट निवडा. बेल्टला शोभणारी पादत्राणं घालता येतील. सध्या बेल्टचा जमाना आहे. त्यामुळे एक चांगलासा बेल्ट नक्की विकत घ्या.

## स्व-मदत हाच प्रगतीचा मार्ग

स्किल डेव्हलपमेंट

सेल्फ-हेल्प म्हणजे स्वतःच्या प्रयत्नांनी शिकणे. स्वतःला सुधारत राहणे आणि आपल्या क्षमतेत वाढ करणे. कौशल्य विकासासाठी स्वत: स्वत:ला मदत करणे खूप महत्त्वाचे ठरू शकते. त्यामुळे माणूस इतरांवर अवलंबून न राहता स्वतःहून पुढे जातो. प्रेरणादायी आणि कौशल्यवर्धक पुस्तके वाचून नवीन कल्पना मिळतात.वेळेचे व्यवस्थापन, संवादकौशल्य किंवा आत्मविश्वास वाढवण्यावर आणि स्वत:ची मदत स्वत:च कशी करावी यावर अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. ऑनलाइन साधनांचा वापर करायला शिकणेदेखील महत्वाचे आहे. यूट्यूब, पॉडकास्ट्स किंवा मोफत कोर्सेस यामुळे नवीन गोष्टी शिकता येतात. इंग्रजी बोलणे, संगणकाचा वापर, किंवा डिजिटल मार्केटिंग यासारखी कौशल्ये घरबसल्या शिकता येतात. तुम्हाला स्वत:शी संवाद करता आला पाहिजे. आत्मपरीक्षण करता आले पाहिजे. आपण कुठे कमी आहोत, स्वत:मध्ये कोणत्या सुधारणा करायला हव्यात याचा विचार केल्याने आपल्याला नेमके काय करायचे आहे, काय मिळवायचे आहे हे लक्षात येते. छोटीमोठी प्रेझेंटेशन्स देणे, नवीन रेसिपी करून पाहणे किंवा लहान ब्लॉग लिहिणे यासारख्या शिकलेल्या गोष्टी प्रत्यक्षात वापरून पाहिल्यामुळे आत्मविश्वास वाढतो. तसेच वेळ पाळणे, कामात सातत्य ठेवणे आणि चुका मान्य करून त्यातून शिकणे ही सेल्फ-हेल्पची खरी ताकद आहे.म्हणूनच, सेल्फ-हेल्प म्हणजे स्वतःहून नवे प्रयोग करणे,नवनवीन गोष्टी शिकणे आणि आत्मपरीक्षणातून स्वतःला अधिक सक्षम बनवणे. यातूनच खऱ्या अर्थाने आपल्यात लपलेल्या कौशल्यांचा विकास होतो.



दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर, शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५ पान नं.८

# गावठी कट्टा बाळगणारे केले गजाआड

## पकडलेले तिनही आरोपी श्रीरामपूर शहरातील



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** गावठी कट्टा बाळगणाऱ्या तिघांना गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी गजाआड केले आहे. त्यांच्याकडून कट्ट्यासह चार जीवंत काडतुसे व कार पोलिसांनी हस्तगत केली आहे.

आनंदा यशवंत काळे (रेणुकानगर, रेल्वे गेट जवळ, श्रीरामपूर), विशाल बबन सोज्वळ (रा. रेणुकानगर, दत्तनगर रोड, विश्वकर्मा मंदीराचे पाठीमागे श्रीरामपूर), विजय यशवंत काळे (रा. निलकंठ ड्रिमस् शांताई रेसिडेन्सी शेजारी, थत्ते ग्राऊंड, वार्ड नं. ७ श्रीरामपूर) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

श्रीरामपूर शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध अग्निशस्त्रे बाळगणारे इसमांची माहिती काढत असतांना पोनि. किरणकुमार कबाडी यांना बातमीदाराकडून ३ इसम हे त्यांचेकडील कारमधून गावठी कट्टा (अग्निशस्त्र) विक्री करीता बेलापूर या ठिकाणावरुन श्रीरामपुरकडे येणार असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार सदर बातमीची माहिती पथकास कळवुन खात्री करुन तात्काळ कारवाई करणेबाबत आदेश देण्यात आले.

पथकाने मिळालेल्या माहितीचे आधारे श्रीरामपुर ते बेलापूर रोडवर अनारसे हॉस्पिटलचे समोर रोडलगत सापळा रचून थांबले असता खबऱ्याने दिलेल्या वर्णनाची कार येताना दिसली. पोलिसांनी ही कार थांबवून गाडीची झडती घेतली असता त्यांना गाडीत गावठी कट्टा व ४ जीवंत काडतुसे आढळून आले.

# रस्त्यावर बेकायदेशीर पत्रा शेड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर-मनमाड रोडवरील नागापूर गावठाण परिसरात महापालिकेच्या मालकीच्या रस्त्यावर बेकायदेशीर उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

छाबरिया यांनी संबंधित जागेवर पत्रा शेड उभारून ते भाड्याने दिल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला असून या अतिक्रमणामुळे रस्त्याची रुंदी कमी होऊन वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण होत आहे.

गेल्या सात आठ महिन्यांपासून या अतिक्रमणाबाबत महापालिकेकडे वेळोवेळी तक्रारी करूनही फक्त वरवरची, दिखाऊ (थातूरमातूर) कारवाई होत असल्याने नागरिकांत संताप वाढला आहे. महापालिकेच्या मालकीच्या रस्त्यावरचे पत्रा शेड महापालिकेने तात्काळ काढून टाकले पाहिजे. आम्ही सातआठ महिने पाठपुरावा करूनही न्याय मिळत नाही. त्यामुळे येत्या १० दिवसांत कारवाई न झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता महापालिका आयुक्त यांच्या दालनासमोर आम्ही उपोषणाला बसू असा इशारा प्रशासनाला दिला.

# पठार भागासाठी पाण्याचा नवा अध्याय सुरू!

## पालकमंत्री विखे पाटील यांची मांडवे, बिरेवाडी जलस्रोतांची पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** अनेक दशकांपासून पाणीटंचाईने होरपळत असलेल्या साकूर पठार भागातील गावांसाठी आता आशेचा किरण निर्माण झाला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी संगमनेरातील मांडवे येथील झिरपी तलाव, बिरेवाडी येथील पाझर तलाव तसेच जांबूत येथील केटीवेअरची प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी आमदार अमोल खताळ, जलसंपदा विभागाचे अभियंते आणि स्थानिक अधिकारी उपस्थित होते. पाहणी दरम्यान जलसंपदा विभागाने उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतल्याची माहिती मंत्र्यांनी दिली. या योजनेअंतर्गत आवश्यक सर्वेक्षणाची प्रक्रिया जलदगतीने सुरू करण्यात आली आहे. या योजनेमुळे मुळा धरणाच्या पाण्यापासून वंचित राहिलेल्या साकूर पठार परिसरातील गावे जोडली जाणार असून आगामी काळात पाणीपुरवठ्याचा मोठा प्रश्न सुटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. साकूर पठारात गेली अनेक वर्षे पाणी टंचाईचे संकट कायम होते.

पिण्याचे आणि शेतीच्या गरजांसाठी पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने नागरिक व शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अनेक वेळा टँकरवर परिस्थिती अवलंबून राहावी लागत होती. बदलत्या हवामानामुळे आणि पावसातील अनियमिततेमुळे दुष्काळाची तीव्रता अधिक वाढली. या पार्श्वभूमीवर उपसा सिंचन योजना हा भागातील कायमस्वरूपी उपाय ठरेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सर्वेक्षण व प्रशासकीय प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना केल्या.

### ग्रामस्थांना आशेचा नवा किरण

आमच्या भागात पहिल्यांदाच विकासाची ठोस पावले उचलली जात आहेत. पाणी मिळाले तर आमचे आयुष्य बदलून जाईल,' असे गावकऱ्यांनी सांगितले. साकूर पठार भागासाठी उपसा सिंचन योजना म्हणजे केवळ पाणीपुरवठ्याची सुविधा नव्हे, तर नव्या विकासाचा पाया ठरणारा उपक्रम असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. आगामी काही महिन्यांत सर्वेक्षण पूर्ण होऊन योजनेचा आराखडा अंतिम होणार असून, शेतकऱ्यांसाठी हा निर्णय नव्या आशेचा किरण बनला आहे.

# पंचायत समितीची जीप धूळखात उभी

## मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष देणार का?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत पंचायत समितीच्या आवारात दोन वर्षांपासून शासकीय बोलेरो जीप धूळ खात उभी आहे. केवळ टायर खराब झाल्यामुळे वापरात न आणलेली ही गाडी आज पूर्णपणे निकामी होण्याच्या मार्गावर आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे आणि जिल्हा परिषदेच्या प्रशासनातील उदासीनतेमुळे शासनाची लाखो रुपयांची मालमत्ता वाया जाण्याची वेळ आली आहे.

पंचायत समितीची एमएच-१६ ६३०५ ही पांढऱ्या रंगाची महिंद्रा बोलेरो जीप दोन वर्षांपूर्वी वापरण्यास पूर्णपणे सक्षम होती. मात्र, टायर निकृष्ट झाल्याने थोड्याच काळासाठी गाडी उभी ठेवण्यात आली. पण त्यानंतर ना नवीन टायर खरेदी झाले, ना गाडीची दुरुस्ती करण्यात आली. परिणामी, ही बोलेरो आता गंज खात पडली असून बॅटरी, वायरिंग आणि इंजिनचे नुकसान होऊ लागले आहे.

चौकशीअंती स्पष्ट झाले की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित विभागप्रमुख यांनी टायरसाठी निधी उपलब्ध करून दिला



नाही. स्थानिक गटविकास अधिकारीही 'वरून मंजुरी मिळत नाही' या कारणावर पळ काढत राहिले. त्यामुळे आज ही बोलेरो समितीच्या दारात निष्प्रयोजन उभी आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका न झाल्याने आज सर्वत्र प्रशासकीय राजवट आहे. लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीमुळे अधिकाऱ्यांना जबाबदारीची जाणीव उरलेली नाही. सभापती आणि सदस्य असते तर कदाचित या वाहनाचे इतके वाईट हाल झाले नसते, असा संताप नागरिकांत व्यक्त होत आहे.

### टायरसाठी दोन लाखांची गाडी धूळखात

आज एक बोलेरो जीप खरेदी करायची म्हटले तरी शासनाला लाखो रुपयांचा खर्च येतो. पण केवळ काही हजारांच्या टायरसाठी दोन वर्षांपासून लाखो रुपयांची सरकारी मालमत्ता निष्क्रिय ठेवण्यात आली आहे. आता तरी विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकरणाची दखल घेऊन गाडी दुरुस्त करून वापरात आणतील का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

# महिला उद्योजिकेला केली शिवीगाळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील बाबुर्डी येथील महिला उद्योजिका रोहिणी नितीन जौंजाळ यांनी व्यवसायातील उर्वरित रकमेच्या व्यवहारावरून झालेल्या शिवीगाळ दमदाटीबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशनला फिर्याद दाखल केली आहे.

रोहिणी जौंजाळ या इतर महिलांकडून परकर शिवून व सॅनिटरी पॅड त्याची विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांची ओळख बचत गटाच्या माध्यमातून सुरेखा दादा मुंढेकर यांच्याशी झाली होती. या व्यवहारातील १० हजार २०० रुपये एवढे बिल उर्वरित असल्याने जौंजाळ या दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वा. मुंढेकर यांच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी घरात पती दादा मुंढेकर हे उपस्थित होते. त्यांनी सुरेखा बाहेरगावी गेल्याचे सांगितले व जौंजाळ या घराबाहेर थांबल्या. काही वेळाने दादा मुंढेकर यांनी घर बंद करून तिथून निघून गेल्याचे फिर्यादीने नमूद केले.

दरम्यान, दुपारी २.३० वाजेपर्यंत त्या घराबाहेर थांबून होत्या. यावेळी सुरेखा मुंढेकर या घराच्या दुसऱ्या दरवाजातून बाहेर पडताना दिसल्याचा उल्लेख फिर्यादीत आहे. त्यानंतरही फिर्यादी घरासमोर थांबून असताना दादा मुंढेकर परत आल्यानंतर परिस्थिती चिघळली.

फिर्यादीनुसार, त्यांनी सुरेखा घरातच असताना खोटे सांगितल्याचा जाब विचारला असता दादा मुंढेकर यांनी संतापून शिवीगाळ दमदाटी केली व जातीवाचक अपमानास्पद शब्दही वापरल्याचे म्हटले आहे. तसेच तू मला पैसे मागतेस? तुला कसे पैसे द्यायचे ते मला माहित आहे, अशी धमकी देत मारहाण करण्याचा प्रयत्न केला व मीच तुझ्यावर कंप्लेंट करतो असे म्हणत तेथून निघून गेले, असे फिर्यादीत नमूद आहे.

# पिल्लांच्या मायेपोटी बिबट्या मादी पिंजऱ्यात

## तीन पिल्ले व मादी वनविभागाच्या ताब्यात; नर बिबट्याचा धोका कायम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** तालुक्यात बिबट्याने प्रचंड धुमाकूळ घातला असून मादी बिबट्या बरोबरच पिल्ले ही आढळून आल्याचे अनेक उदाहरणे आढळून आले आहेत. निघोजच्या मोरवाडी येथे ऊसाच्या शेतात ३ बिबट्याची पिल्ले अंदाजे १५ ते ३० दिवसांची ३ पिल्ले पिंजऱ्यात ठेवले असता, पिल्लयांच्या मायेपोटी आई मादी बिबट्या ही अलगद जेरबंद झाल्याने ग्रामस्थांचा जीव भांड्यात पडला.

कित्येक दिवसांपासून निघोज परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. परवा गुरुवारी निघोजच्या मोरवाडी येथील शेतकरी सनी रसाळ व विकास रसाळ यांच्या उसाच्या शेतात बिबट्याची ३ पिल्ले आढळून आल्यानंतर ग्रामस्थांनी वनपाल अंकराज जाधव यांना या घटनेची माहिती दिली असता, त्यांनी त्वरीत मोरवाडी येथे येत ती ३ पिल्ले ताब्यात घेतली. पण जवळपास त्यांची आई मादी बिबट्या आढळून आली नाही.

या मादीला पकडण्यासाठी वनविभागाने पिंजरा लावला व त्या पिंजऱ्यात पिल्लांना ठेवले. परंतू दिवसभरात मादी फिरकले नाही. रात्री उशिरा ८ वाजता पिल्लांच्या मायेपोटी पिंजऱ्यात ती मादी गेली असता, अलगदपणे पिंजऱ्यात ती मादी बिबट्या जेरबंद झाली. या मादीने येथील २ कुत्रे फस्ते केले, पण नर बिबट्या यावेळी आढळून आला नाही. त्याचा ही धोका जवळपास च्या शेतकऱ्यांना नक्कीच संभवतो आहे.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांचा केला सत्कार पारनेरचे वनाधिकारी धाडे यांच्या मार्गदर्शना खाली वनपाल एस एन भालेकर , एम वाय शेख, कानिफ साबळे, अंकराज जाधव, वनरक्षक संदीप कार्ले व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतल्याने ही मादी व ३ पिल्ले अलगद पणे पिंजऱ्यात जेरबंद झाल्याने निघोज करांचा जीव भांड्यात पडला. वन कर्मचाऱ्यांच्या या कामगिरीचे निघोज ग्रामस्थांनी कौतूक केले आहे.

# सात्रळ-सोनगाव रोडचे कॉँक्रिटीकरण

## दीर्घ प्रतीक्षेनंतर सात्रळ विकासकामांना सुरूवात; नागरिकांत समाधान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनगाव :** सोनगाव व आसपासच्या भागातील नागरिकांना अनेक वर्षांपासून त्रास होणाऱ्या रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. खड्डेमय, चिखलयुक्त आणि प्रवासासाठी धोकादायक ठरलेले रस्ते सुधारण्यासाठी दीर्घकाळापासून स्थानिकांनी केलेली मागणी आता प्रत्यक्षात येऊ लागली आहे.



रस्त्यांची झालेली बिकट स्थिती, विशेषतः बाजारपेठेतील वाहतुकीची समस्या, शाळकरी विद्यार्थ्यांचा त्रास आणि व्यापाऱ्यांची अडचण यामुळे या विकासकामांची आवश्यकता अत्यंत तातडीची झाली होती. नुकताच सात्रळ चौक सोनगाव चौक या महत्त्वपूर्ण मार्गाच्या कॉँक्रिटीकरण कामाचे तसेच सात्रळ बाजारतळाच्या मुरमीकरण कामाचे भूमिपूजन उत्साहात आणि शुभशकुनात संपन्न झाले. या दोन्ही कामांसाठी जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष निधीचा, तसेच माजी खासदार डॉ. सुजय दादा विखे पाटील यांच्या सहकार्याचा मोठा हातभार लागला आहे.

अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेल्या बाजारपेठेच्या रस्त्यांवर मोठे खड्डे, पावसाळ्यात पाणी साचून चिखलाचे साम्राज्य आणि उन्हाळ्यात प्रचंड धुळीचा त्रास या समस्यांमुळे रहिवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या विकासकामांविषयी स्थानिकांमध्ये मोठा आनंद व्यक्त केला जात आहे.

# कुंटणखान्यावर पोलिसांची मोठी कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी पोलीस स्टेशनच्या पथकाने १३ नोव्हेंबरच्या रात्री गुप्त माहितीच्या आधारे भुतेटाकळी फाटा (पाथर्डी-खरवंडी रोड) येथील हॉटेल अक्षय लॉजिंग व बिअर बार-परमिट रूम समोर पत्र्याने तयार केलेल्या खोल्यांवर मध्यरात्री छापा टाकून मोठी कारवाई केली.

गेल्या काही दिवसांपासून सदर ठिकाणी वेश्याव्यवसाय सुरु असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक विलास पुजारी



यांना मिळाली होती. वरिष्ठांच्या आदेशानुसार महिला पोलीस अंजू सानप यांच्या फिर्यादीवरून पथकाने कारवाई केली.

छापा टाकताच दोन खुर्च्यांवर बसलेले इसम पाहताच एकजण अंधाराचा फायदा घेत पळून गेला. तर एक जण इंद्रजित ओमप्रकाश ठाकूर (रा. जामखेड) याला ताब्यात घेतले स्वतः मॅनेजर असल्याचे सांगितले. श्रीराम राधाकिसन फुंदे (रा. भुतेटाकळी, पाथर्डी) मुख्य मालक हा फरार झाला आहे.

येथील रुम क्रमांक १ ते ६ मध्ये मुंबई (मालवणी), नाशिक, पुणे संभाजीनगर, नांदेड, परभणी दिल्ली (जुनी दिल्ली, नवी दिल्ली) येथील एकूण २६ महिला विविध शहरांमधून आणून ठेवण्यात आल्या होत्या. महिलांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी श्रीराम फुंदे व इंद्रजित ठाकूर हेच त्यांना वेश्याव्यवसायासाठी पैसे देऊन काम करवून घेतात, ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांपैकी काही रक्कम महिलांना देऊन उरलेली स्वतःकडे ठेवतात, अशी कबुली दिली.

याप्रकरणी अटक केलेला इंद्रजित ठाकूर याला सोमवार पर्यंत पाथर्डी न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावणी आहे.

### यांना घेतले पोलिसांनी ताब्यात

गौरव कारंडे, अजित सय्यद, स्वामी नागरगोजे, रोहन धांडे, उलवेद धांडे, मारुती चंदन, अक्षय कदम, प्रशांत पवार, सोपान आंधळे, आप्पासाहेब दौंड, संदीप फटांगडे, आवेज मनियार, संजय खेडकर, सुरज शिंदे, निलेश एडके, विनोद शिंदे (सर्व विविध गावे पाथर्डी, जामखेड, बीड, शिरूर) येथील वेश्यागमनासाठी आलेले १६ व्यक्तींना पोलिस पथकाने ताब्यात घेतले.

# पाथर्डीत उमेदवारी अर्जांना सुरुवात

## पाचव्या दिवशी नगराध्यक्षासह सहा उमेदवारांनी भरले फॉर्म

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी नगरपरिषदेच्या निवडणुकीत शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरूवात होताच नगराध्यक्ष पदासाठी एक तर नगरसेवक पदासाठी पाच अशा एकूण सहा उमेदवारी अर्जांची नोंद झाली. नगराध्यक्ष पदासाठी अमोल अशोक गर्जे यांनी अर्ज दाखल केला, तर नगरसेवक पदासाठी अमोल अशोक गर्जे (प्रभाग ५-ब), प्रशांत विजय शेळके (प्रभाग ६-ब), जगदीश शिवाजी काळे (प्रभाग १०-ब), रमेश मुरलीधर काटे (प्रभाग ४-ब) आणि पल्लवी विशाल तरटे (प्रभाग २-ब) यांनी आपले अर्ज दाखल केले आहेत.

ही सर्व उमेदवारी भारतीय जनता पक्षाच्या वतीने दाखल करण्यात आली असूनही कोणत्याही अर्जास अधिकृत एबी फॉर्म जोडलेला नसल्याने, पक्षाच्या अधिकृत उमेदवारांबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. १० नोव्हेंबरपासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून पाचव्या दिवशी प्रथमच उमेदवारांनी प्रत्यक्ष अर्ज दाखल करण्यास ओघ दिला. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेत अर्ज भरण्यास किमान अडीच ते तीन तास लागत असल्याने आणि कधी कधी वेबसाईटवरील तांत्रिक अडचणींमुळे हा कालावधी अधिक वाढत असल्याने इच्छुक उमेदवार व प्रतिनिधींची चांगलीच दमछाक होत आहे.

# बाहेरून लादलेलं नेतृत्व जनतेला अमान्य

## युवानेते विवेक कोल्हे; ही निवडणूक विकासाची नव्हे, तर स्वाभिमानाची

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** बाहेरून लादलेल नेतृत्व कोपरगावची जनता केव्हाही सहन करणार नाही, असे वक्तव्य युवानेते विवेक कोल्हे यांनी विरोधकांवर प्रतिहल्ला चढविला आहे.

काका कोयटे राष्ट्रवादीच्या काळे गटात दाखल झाल्यानंतर भाजपच युवानेते विवेक कोल्हेंनी पत्रकार परिषदेत थेट आणि घनाघाती हल्लाबोल केला. गुरुवारी (१३) सायंकाळी साडेसात वाजता संपर्क कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी नाव न घेता पण बोट दाखवून तालुक्याबाहेरील आकाचा खेळ आणि इथल्या आमदाराच्या मांडलिकत्वाचं राजकारणाचा पर्दाफाश केला.

एका तरुणाचं वाढतं नेतृत्व काहींना खूपलं. म्हणूनच तालुक्याबाहेरील आकानी काकांची उमेदवारी पक्की केली. कार्यकर्त्यांना डावलून बाहेरून लादलेला उमेदवार आणणं ही स्व:पक्षाच्या व कोपरगावच्या स्वाभिमानाची गळचेपी आहे, असा जोरदार प्रहार कोल्हेंनी केला.पन्नास वर्ष कोपरगावची धूळ न पाहणाऱ्या काकांना अचानक विकासाची भाषा का सुचली? हीच का त्यांची जनतेशी नाळ?



कोपरगावकरांना फक्त मोठ्या मोठ्या कामांना येणार असे म्हणणारा हेलिकॉप्टर उमेदवार नको, त्यांना रात्री दोन वाजता देखील फोन उचलणारा लोकांचा माणूस हवा. आज ७६ वर्षांचे आणि पुढच्या पाच वर्षांत ८१ पार करणाऱ्या उमेदवाराकडून विकासाचा वेग नव्हे, तर थकवा मिळणार आहे. कोपरगावचं भविष्य तरुणाई घडवणार भूतकाळ नव्हे. ही जनता वृद्धत्वाकडे झुकलेल्या नेतृत्वाला नव्हे, नव्या उमेदीच्या नेतृत्वाला संधी देणार आहे, त्यांच्याकडे संदीप कोयटेसारखा युवक होता असा इशारा देखील कोल्हेंनी केला.

कोल्हेंनी काळे गटाच्या कामगिरीवर थेट टीका करताना म्हटल, पाणीप्रश्न सुटल्याचा डांगोरा पिटतात; पण वास्तवात वर्षातून फक्त ७२ दिवस पाणी दिलं जात, आणि दिवसाचा खर्च एक लाख ! हा प्रचंड भ्रष्टाचार नाही का? चार वर्षे नगरपालिका प्रशासक व आमदार यांच्या ताब्यात होती; मग कोणी प्रश्न विचारला का?'' काकांनी याचं आत्मचिंतन करण्यास काहीच हरकत नाही.

विकासाच्या भाषेवर प्रत्युत्तर देताना ते म्हणाले, कोपरगाव बसस्टँड, तहसील, फायर स्टेशन, न्यायालय, पंचायत समिती, नगरपालिका या सर्व इमारती माजी आ. स्नेहलता कोल्हे यांच्या कालखंडात झाल्या. हे विरोधकही मान्य करतात. मग आज अचानक विकासाचा शोध घेणाऱ्या लोकांची विकासाशी बांधिलकी कुठे होती? असा सवालही कोल्हे यांनी उपस्थितीत केला.

पक्षातील उमेदवारांबाबत स्पष्ट भूमिका मांडली. आमचे २१ उमेदवार फायनल होते. त्यातील एक गेला २० उमेदवार ठाम आहेत. कुठलीही नाराजी नाही. आम्ही कार्यकर्त्यांना न्याय दिला आहे, युवकांना संधी दिली आहे. आम्ही लोकांमध्ये राहतो, त्यांच्या दुःखात उभे राहतो. पण काहीजण वैयक्तिक स्वार्थासाठी तालुक्याबाहेरील शक्तींसमोर नतमस्तक झाले असल्याचा टोलाही युवानेते विवेक कोल्हे यांनी लगावला.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11